गुरुवार, २५ मे २०२३
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२५६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 25 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-256 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


# एकोणीस विरोधी पक्षांचा बहिष्कार

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते होणार नव्या संसदेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : २८ मे रोजी देशाच्या नव्या संसदेचे उद्घाटन केले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या भवनाचे उद्घाटन केले जाणार आहे. सेंट्रल व्हिस्टा या नावाने हा प्रकल्प ओळखला जातो आहे. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या संसद भवनाचे उद्घाटन करणार असल्याने १९ विरोधी पक्ष आक्रमक झाले आहेत. या सगळ्या पक्षांनी या सोहळ्यावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे.**

नव्या संसद भवनाच्या उद्घाटनाविषयी राहुल गांधी यांनी एक ट्वीट केले होते. त्यांनी असे म्हटले होते की या भवनाचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले पाहिजे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नाही. हे ट्वीट राहुल गांधी यांनी २१ मे रोजी केले होते. यानंतर हा मुद्दा आणखी पुढे आला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसद भवनाचं उद्घाटन करण्याचा विरोधकांनी विरोध दर्शवला.

ज्येष्ठ काँग्रेस नेते आनंद शर्मा यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नव्या संसदेचे उद्घाटन करणे हे घटनेला धरुन नाही अशी भूमिका मांडली होती. जेव्हा या संसद भवनाच्या बांधकामाचं भूमीपूजन करण्यात आले होते तेव्हाही राष्ट्रपतींना बोलावले गेले नाही. तसंच आता संसद भवन बांधून पूर्ण झाले या कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्यालाही राष्ट्रपतींना निमंत्रण देण्यात आलेलं नाही. या सोहळ्यापासून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंना दूर ठेवणे योग्य नाही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वतः त्यांना निमंत्रण दिले पाहिजे असंही शर्मा यांनी म्हटले आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही ट्वीट केले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपतींना या सोहळ्याला का बोलावलं नाही असा सवाल केला. राष्ट्रपती या भारताच्या प्रथम नागरिक आहेत त्यांनाच या सोहळ्याला बोलावणे आवश्यक आहे तरीही त्यांना का बोलावले नाही ही बाब लोकशाही मूल्यांना धरुन नाही असे ट्वीट खरगेंनी केले होते. नव्या संसद भवनाचे उद्घाटन हा देशाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा सोहळा आहे. देशात लोकशाही धोक्यात आहे तरीही आम्ही या नव्या संसद भवन निर्मितीबाबत काही बोललो नाही. आपल्या देशासाठी हा महत्त्वाचा क्षण आहे म्हणून या सोहळ्याला उपस्थित राहणार होतो. मात्र या सोहळ्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनाच निमंत्रण देण्यात आलेले नाही. नव्या संसदेचे उद्घाटन पंतप्रधान मोदी करणार आहेत. ही बाब म्हणजे आपल्या देशाच्या लोकशाहीवर थेट हल्ला आहे. संसद खिळखिळी केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उद्घाटन सोहळ्याला राष्ट्रपतींना न बोलवणे हा लोकशाहीवर



केलेला हल्ला आहे. आम्ही त्यामुळेच या कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे असे पत्रक विरोधी पक्षांनी जारी केले आहे.

## महत्वाची बातमी

### बारावीचा निकाल उद्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल कधी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अशातच महाराष्ट्र बोर्डाचा बारावीचा निकाल उद्या जाहीर करण्यात येणार आहे. बोर्डाकडून  लवकरच अधिकृतपणे निकालाबाबत माहिती दिली जाणार आहे. दुपारी दोन वाजता बारावीचा निकाल विद्यार्थ्यांना ऑनलाईन पाहता येणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा यंदा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. आता मात्र विद्यार्थी आणि पालकांना निकालाची प्रतीक्षा होती. अखेर प्रतीक्षा संपली आहे. उद्या निकाल जाहीर झाल्यानंतर 26 मे पासून 5 जून पर्यंत विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी संकेतस्थळावर अर्ज करता येईल तर उत्तर पत्रिकेच्या छायाप्रतीसाठी 26 मे ते 14 जून दरम्यान ऑनलाईन अर्ज विद्यार्थ्यांना करता येणार आहे. तर गुणपत्रिका 5 जून रोजी महाविद्यालयात मिळणार आहे. उद्या दुपारी दोन वाजल्यानंतर हा निकाल बोर्डाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पाहता येणार आहे. तसेच 'एबीपी माझा'च्या संकेतस्थळावरही बारावीचा निकाल पाहता येणार आहे. यंदा 14 लाख 57 हजार 293 विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती.



# शेंद्रा-वाळूज ओव्हर ब्रिजसंदर्भात दिल्लीत महत्त्वाची बैठक

## अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** छत्रपती संभाजी नगर शहरातील चिकलठाणा ते वाळूज असा सरसकट एकच ओव्हर ब्रिज आणि निईओ मेट्रोचे कामे आणि त्यासंदर्भात येणाऱ्या अडचणी, प्रशासकीय परवानग्या, तांत्रिक अडचणी लवकरात लवकर सोडविण्यात याव्या अशा ,स्पष्ट सूचना केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी नवी दिल्लीमध्ये महा मेट्रो आणि राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या बैठकीत दिल्या आहे.

या बैठकीमध्ये ओव्हर ब्रिज आणि अठरा किलो मीटर नीईओ मेट्रो संदर्भात लागणाऱ्या वेगवेगळ्या डिपार्टमेंटच्या परवानग्या त्या डिपार्टमेंटच्या अंतर्गत तांत्रिक मुद्द्यावर देखील चर्चा करण्यात आली. शेंद्रा ते संभाजीनगर रेल्वे स्टेशन पहिला टप्पा आणि दुसऱ्या टप्प्यात संभाजीनगर ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन मेट्रोचा मार्ग असणार आहे. यामध्ये प्रामुख्याने महामेट्रो  डेपो संदर्भात जागेची अडचण, चिकलठाणा आंतरराष्ट्रीय विमानतळा समोर ब्रिज आणि मेट्रोची उंची, भडकल गेट, दिल्ली गेट परिसरात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडून परवानगी मिळण्यासंदर्भात येणाऱ्या अडचणीवर यावेळी चर्चा करण्यात आली तसेच केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड यांनी लवकरात लवकर सर्व विभागाने परवानगी द्याव्यात आणि सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र सरकारकडे सादर करावा, अशा स्पष्ट सूचना देखील दिल्यात. शहरातील प्रस्तावित शेंद्रा ते वाळूज, ओव्हर ब्रिज आणि निईओ मेट्रो सविस्तर प्रकल्प अहवाल आणि त्यासंबंधीत काही तांत्रिक

> चिकलठाणा विमानतळ समोर ओव्हर ब्रिज आणि मेट्रो उंची संदर्भात काही तांत्रिक मुद्दे होते त्यावरही चर्चा करण्यात आली . भडकल गेट येथील मेट्रो लाईन संदर्भात भारतीय पुरतत्व सर्वेक्षण विभागाची जागेची परवानगी आणि काही तांत्रिक मुद्दे अडचण होती, त्यावर केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ .भागवत कराड यांनी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दिल्लीमध्ये चर्चा केली आणि तत्काळ परवानगी द्यावीत, अशी सूचना केली आहे .

मुद्दे, अडचणी सोडविण्यासंदर्भात केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांनी आज नवी दिल्लीमध्ये नॉर्थ ब्लॉक अर्थ मंत्रालयामध्ये दुपारी महत्त्वपूर्ण बैठक घेतली.

या बैठकीसाठी एन. एम .येवतकर कार्यकारी व्यवस्थापक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, विकास नागुलकर कार्यकारी व्यवस्थापक महा मेट्रो ,संकेत केळकर व्यवस्थापक महामेट्रो ,श्याम वेंकटेश, उदय जयस्वाल वरिष्ठ अभियंता महा मेट्रो, जी.श्रीकांत महानगरपालिकेच्या आयुक्त हे उपस्थित होते.तर  संभाजीनगरचे जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पांडे ऑनलाईन व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे बैठकीसाठी सहभागी झाले होते. शहराच्या विकासात अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या चिकलठाणा ते वाळूज एकच ओव्हर ब्रिजच्या संदर्भात काही तांत्रिक अडचणी होत्या. यामध्ये प्रामुख्याने विमानतळ प्राधिकरण, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग राज्य शासनाच्या मेट्रोसाठी डेपो साठी जागा उपलब्ध जागा देण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा झाली. लवकरात लवकर जागा देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पांडे यांनी  बैठकीत सांगितले.

# मनोहर जोशी यांची प्रकृती चिंताजनक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांना काल ( २३ मे ) हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची प्रकृती खालावल्याने उपचारांसाठी त्यांना रुग्णालयात हलवण्यात आले होते. हिंदुजा रुग्णालयाने आता मेडिकल निवेदन जारी करून त्यांच्या प्रकृतीसंबंधित माहिती दिली आहे. एएनआयने यांसंबंधीचे वृत्त दिले आहे. मनोहर जोशी यांच्या प्रकृतीसंबंधित माहिती देण्याकरता हिंदुजा रुग्णालायने मेडिकल स्टेटमेंट जारी केले आहे. यानुसार, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी २२ मे रोजी आपत्कालीन परिस्थितीत पी.डी. हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ते सेमिकोमामध्ये असून त्यांचा श्वासोच्छवास सुरू आहे. तसेच मनोहर जोशी वेंटिलेटरवर नसल्याचेही रुग्णालयाने स्पष्ट केलं आहे. रुग्णालयाने म्हटले आहे की, मनोहर जोशी यांची परिस्थिती चिंताजनक असून ते अर्धवट बेशुद्धावस्थेत आहेत. त्यांना आयसीयूमध्येच ठेवण्यात येणार आहे. त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. मनोहर जोशी हे बाळासाहेब ठाकरे यांच्या अत्यंत निकटवर्तीयांपैकी एक आहेत. त्यांना जोशी सर असेही संबोधले जाते. मनोहर जोशी यांचे वय ८६ वर्षे आहे. शिवसेनेकडून विधानपरिषदेवर निवडून येत त्यांनी त्यांची राजकीय कारकीर्द सुरू केली होती. १९७६ ते १९७७ या काळात ते मुंबईचे महापौरही झाले. तर शिवसेना भाजपाच्या युतीचे सरकार जेव्हा १९९५ मध्ये आले तेव्हा मनोहर जोशी हे मुख्यमंत्रीही झाले होते. गेल्या काही काळापासून राजकारणात मनोहर जोशी फारसे सक्रिय नव्हते. मनोहर जोशींनी मुंबई महापालिकेचे नगरसेवक, महापौर, विधान परिषद सदस्य, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, खासदार, केंद्रीय अवजड उद्योग मंत्री, लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभा सदस्यपदही भूषवले आहे.







# आझम खान यांना कोर्टाचा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** रामपूरचे माजी आमदार आणि समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय महासचिव आझम खान यांना कोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. रामपूरच्या विशेष एमपी-एमएलए कोर्टाने बुधवारी हेट स्पीच प्रकरणात निर्णय दिला. या निर्णयानुसार, सपा नेता आझम खान यांना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. याच हेट स्पीचमुळे आझम खान यांची आमदारकी गेली होती. आझम खान यांच्या द्वेषपूर्ण भाषणप्रकरणी बुधवारी रामपूरच्या विशेष न्यायालयात सुनावणी झाली. बुधवारी न्यायालयाने आझम खान यांची या प्रकरणात निर्दोष मुक्तता केली. मात्र, याआधी रामपूरच्या कनिष्ठ न्यायालयाने त्यांना याच प्रकरणात तीन वर्षांची शिक्षा सुनावली होती.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आनंदही एखाद्या व्हायरस सारखा असतो. तो सभोवताली पसरत जातो. भोवतालच्या माणसांना आपल्या आनंदात सामील करून घेतो. अशा वेळी चेहऱ्यावर गंभीरतेचा मास्क लावायचा नसतो. त्यात सामील व्हायचे असते. लहान मुलं खूप आनंदी का असतात यामागील कारणाचा आपण कधी विचार केला आहे का ? त्याचे कारण आहे ती दिवसातून अनेक वेळा खळखळून हसतात. त्यांना काही कारण लागत नाही. ते हसतात म्हणून आनंदी असतात. आणि आनंदी असतात म्हणून हसत राहतात. जसजसे आपले वय वाढते तसतसे आपले हसणे कमी होत जाते. पण हे तितकेसे खरे नाही. आपले हसणे कमी होत जाते म्हणून आपले वय वाढत जाते. सदैव हसतमुख असणारी माणसे वयाला पराभूत करतात. वय ही त्यांच्यासाठी फक्त एक संख्या असते. आपण जेव्हा एखाद्या मंदिरात जातो तेव्हा तेथील देवाच्या मुद्रेवरचे प्रसन्न भाव पाहून आपलेही मन आनंदित होते. परमेश्वर आनंदस्वरूप आहे. म्हणूनच परमेश्वराच्या मूर्ती कायम प्रसन्न असतात. श्रीकृष्णाचे वागणे बोलणे कसे होते हे आपण प्रत्यक्ष तर पाहिले नाही पण आतापर्यंत त्याच्याबद्दल जे काही वाचले, मालिकांमध्ये पाहिले, त्या सगळ्यात त्याच्या प्रसन्न आणि हसतमुख व्यक्तिमत्वाचा प्रभाव आपल्यावर पडतो. संकटांना सुद्धा हसतमुखाने सामोरे जा ही आपल्या राम कृष्ण आदी देवांनी दिलेली आपल्याला शिकवण आहे. आपण नेमकी तीच विसरतो. साधना, तपश्चर्या करणाऱ्या मंडळींच्या, साधू संतांच्या मुखावर एक विलक्षण तेज आणि प्रसन्नता विलसत असते. त्यांची मुद्रा कायम आनंदी असते. कारण हा आनंद आतून एखाद्या फुलासारखा उमलून आलेला असतो. वृत्ती आनंदी असली की आपला चेहरा ती आपोआपच दर्शवतो. चेहरा हा मनाचा आरसा आहे. मन स्वच्छ तर चेहरा स्वच्छ. चेहऱ्यावर मुखवटे लावून फिरणारांची गोष्टच वेगळी. त्यांच्याबद्दल मी बोलत नाही. पण शरीराच्या स्वच्छतेसाठी जसा साबण आवश्यक तसाच मनाच्या निर्मळतेसाठी हास्ययोग आवश्यक. परमेश्वराने हास्य ही मानवाला बहाल केलेली देणगी आहे. इतर कोणत्याही प्राण्याला ती नाही. गोष्टीतले प्राणीच फक्त हसतात. समोरच्या ओळखीच्या व्यक्तीला पाहून तर आपण स्मितहास्य करतोच पण अनोळखी व्यक्तींच्या संपर्कात आल्यानंतरही आपण जर सुहास्य मुद्रेने त्यांना सामोरे जाऊ शकलो तर संबंधात एक मोकळेपणा, नैसर्गिकपणा येतो. काही व्यक्ती हसण्यातही काटकसर करतात. मोजून मापून हसतात. कोणी कोणी तर चेहऱ्यावरची गंभीरतेची इस्त्री मोडू देत नाहीत. म्हणून ' एखादी तरी स्मितरेषा...' असे म्हणावे लागते. पण आपण जर खळखळून हसलो तर त्याचे अनेक फायदे होतात.



## आनंदी पहाट

## संवादाअभावी वादच निर्माण होतात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

एका व्यक्तीसारखी दुसरी व्यक्ती आपल्याला शोधूनही सापडत नाही. एखाद-दुसऱ्या गोष्टींमध्ये कदाचित साम्य असेल, पण व्यक्तिमत्वातील अगदी तंतोतंत सारखेपणा कधीच दिसून येत नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती असे नेहमीच आपण सर्वत्र अनुभवत असतो. प्रत्येक व्यक्तीच्या विचारांतच फरक असतो. अर्थात तो तसा आचार आणि संस्कारांत देखील असतो. एखाद्या व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, बोलण्याच्या सवयी, लकबी अगदी सगळ्यांतच भिन्नता असते. ह्या भिन्नतेमुळे अनेकदा आपापसातील विचार, आचार आणि व्यवहारात कमी अधिक प्रमाणांत समस्या भेडसावत असतात. ह्यासाठी एकमेकांचे ताळतंत्र, थोडे का होईना पण सांभाळायला लागते. सर्वप्रथम संवादाचे महत्व समजून घेण्याची आणि शास्त्र अवगत करण्याची आवश्यकता असते. ह्या संवादात व्यक्तिगत विचार समाविष्ट झालेले असतात. खरे तर ते विचारच अधिक महत्वाचे असतात. संवादाचे सुख ही ज्याची त्यानी अनुभूती घेण्याची बाब असते. स्वतःच भावनिक, मानसिक, आंतरिक आणि शारीरिक पातळीवर प्रत्येक संवाद घडवून आणायचा असतो. काहीवेळा न बोलणाऱ्या व्यक्तीला बोलके करायचे असते. त्यांची होणारी घुसमट घालवण्यासाठी त्याला बोलते करणे गरजेचे असते. अलीकडच्या काळांत विभक्त कुटुंब, कौटुंबिक कलह आणि निर्माण झालेले क्लेश, द्वेष ह्यामुळे बहिण-भाऊ, भाऊ-भाऊ, पती-पत्नी, पिता-पुत्र, सासू-सून यांच्यात विचारांचे आदान प्रदान होतेच असे नाही. रक्ताच्या नात्यांत देखील अविचार आणि संवादाआभावी अनेक गैरसमज, समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. आपली सुख-दुःख, भाव-भावना, विचार-आचार, ह्या बाबींची देवाणघेवाण करायला वावच नसतो, असे नाही. परंतू विचारांच्या माध्यमातून सुखाच्या यशोशिखरांवर पोहोचण्यासाठी आपापसातील संवादालाच बगल दिली जाते. परस्परांमधील नातेसंबंध, आपलेपणाची भावना, जिव्हाळा, प्रेमाचा ओलावा कसा आणि कोण टिकवणार ? हाच कळीचा मुद्दा आहे.



आधुनिक केसरी

**तूच मज तारी | माय-बापा ||**

प्रेम आस्था माया | शब्दांचे जंजाळ ||
नाही ताळमेळ | भावनेचा ||१||
होतो कोंडमारा | हुंदक्यांचा आता ||
वेदनेची गाथा | कळवळे ||२||
मायेवीन कैसा | अर्थ जगण्याला ||
पाझर आटला | काळजात ||३||
त्रासलो मी देवा | जगराहटीने ||
ग्रासले स्वार्थाने | जगु कैसा ||४||
होऊनी याचक | आलो तुझ्या दारी ||
तूच मज तारी | माय-बापा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

गृहं च मे कृषिं चापि पुत्रान् च देहि मे शिवे | तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ८ || हे शिवे, मला गृहसुख दे, कृषीसुख दे, प्रजा दे. मी तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


पूर्ब कर्म इस देह का, कारण यौगिक भोग । तीन भोग इह भोगता, केवल पूर्व न भोग ।।०८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/०८

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

पूर्व कर्मांचा भोग, या देहाचे कर्म आणि संयोगिक भोग अशा तीन भोगांना आत्मा या शरीरात भोगतो. केवळ पूर्व कर्मांचा भोगच भोगत नाही.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प २८वे

आधुनिक केसरी

"हरिहाट-उत्सव, संपन्न झाला
श्रीमहाराजांचा काशी मुक्काम हलला
फिरत फिरत ते इंदोरला आले
गावाबाहेरच ते राहू लागले ।।१ ।।
विलक्षण अवस्थेत"असता
महाराजांची कधी ही समाधी लागे
शरीर त्यांचे काष्ठ कठीण होई
सोबती जो,त्यास सांभाळावे लागे ।।२ ।।
घरून पळून आलेला मुलगा
महाराजांच्या सोबत राहू लागला
श्रीमहाराजांची समाधी लागता
एकेदिनी मुलगा पळून गेला ।।३ ।।
मारोतीदर्शनास आलेल्या एका
गवळ्याने चिखलाने भरलेल्या
महाराजांना पाहिले, स्वच्छ केले
मारोतीमंदिरी आणून ठेविले ।।४ ।।
म्हणे-कवी अरुणदास ,सांगीन हो
इंदोरी मुक्कामी पुढे काय घडले ..।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## कोणत्याही कृतीत हेतू शुद्ध पाहिजे

आधुनिक केसरी

तमोगुण हा तिन्ही गुणांत जास्त जड असल्याने त्याचा परिणाम या जगामध्ये लगेच दिसून येतो. दुष्ट बुद्धी हा तमोगुणाचा परिणाम आहे. परंतु भगवंताच्या नामाने बुद्धी स्वच्छ करण्याची सोय माणसाच्या ठिकाणी आहे. यासाठी पुष्कळ नामस्मरण करावे, म्हणजे सत्त्वगुणाचा उदय होतो आणि बुद्धी शुद्ध बनते. देहाला कष्ट दिले म्हणजे भगवंत वश होतो हे काही खरे नाही. तसे जर असते तर रस्त्यात उन्हामध्ये खडी फोडणाऱ्यांना भगवंत लवकर वश झाला असता ! भगवंताचे लक्ष आपल्या देहापेक्षा मनाकडे असते. आपल्या मनामध्ये प्रापंचिक हेतू ठेवून भगवंताच्या नावाने उपवासासारखे कितीही कष्ट केले तरी, ते पाहून लोक फसतील, पण भगवंत फसणार नाही. आपण जसे बोलतो तसे वागण्याचा अभ्यास करावा. परमार्थामध्ये ढोंग फार बाधक असते. प्रापंचिक गोष्टीकरिता उपवास करणे ही गोष्ट मला पसंत नाही. उपवास 'घडावा' यात जी मौज आहे ती उपवास 'करावा' यामध्ये नाही. भगवंताच्या स्मरणामध्ये इतके तल्लीन व्हावे की आपण



नेहमी त्याच्याजवळ वास करतो आहोत असे मनाला वाटावे. मग देहाने अन्न खाल्ले म्हणून कुठे बिघडले ? याउलट, आपल्या चित्तात भगवंताचे नाम नसताना आपण देहाने पुष्कळ उपवास केले, तरी अशक्तपणाशिवाय दुसरे काही पदरात पडणार नाही. काही लोक वेडे असतात; त्यांना आपण उपासतापास कशासाठी करतो आहोत हेच समजत नाही.

कोणत्याही कृतीला वास्तविक मोल तिच्या हेतूवरून येते. हेतू शुद्ध असून एखादे वेळी कृती बरी नसली तरी भगवंताच्या घरी चालते; पण हेतू चांगला नसून कृती मात्र फार चांगली असली तरी भगवंत त्यापासून दूरच राहतो. माणसाने केलेला उपवास निष्काम असून, तो केवळ भगवंताच्या स्मरणात राहावे म्हणून केलेला असला तर फारच उत्तम आहे. निष्काम कर्माचे फार फार महत्त्व आहे. 'भगवंतासाठी भगवंत हवा' अशी आपली वृत्ती असावी. किंबहुना, नाम घेत असताना, प्रत्यक्ष भगवंत समोर उभा ठाकला, आणि 'तुला काय पाहिजे ?' असे त्याने विचारले, तर 'तुझे नामच मला दे' हे त्याच्याजवळ मागणे, याचे नाव निष्कामता होय. कारण, रूपाने व्यक्त झालेला भगवंत केव्हातरी नाहीसा होईल, पण त्याचे नाम मात्र अखंड टिकेल; आणि त्याचे नाम घेतले की त्याला आपल्याकडे येणे जरूर आहे. म्हणून, देहाला कष्ट देण्याच्या भानगडीत न पडता भगवंतासाठीच नाम घेत असावे. त्याची कृपा झाल्याशिवाय राहणार नाही. **आजचे बोधवचन आहे - जेथे नाम तेथे राम हा ठेवावा विश्वास ।कृपा करील रघुनाथ खास ॥श्रीराम समर्थ**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

केचिदज्ञानतो नष्टाः केचिन्नष्टाः प्रमादतः ।
केचिद् ज्ञानावलेपेन केचिन्नष्टैस्तु नाशिताः ॥

स्पष्टीकरण - अज्ञान हे वाईट. ते माणसाला धोक्यात आणते. काही माणसे विचार न करता आपल्याला झेपणार नाहीत, अशा गोष्टी करायला जातात आणि नाश पावतात. काही माणसे ज्ञानाच्या गर्वाने फुगून जातात आणि तो गर्व त्यांचा नाश करतो. चौथे कारण वेगळे आहे. काही माणसे आधीच दिवाळखोर बनलेली असतात. त्यांना दुसऱ्याचे बरे बघवत नाही. ती उद्योग करणाऱ्याला धोक्यात आणायला कमी करीत नाहीत. हे चारी धोके टाळून माणसाने आपल्या प्रगतीचा मार्ग चोखाळावा.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, २५ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

## राहुल गांधींचा ट्रकमधून प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**चंडीगड, नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोमवारी रात्री दिल्लीपासून चंडीगडपर्यंत ट्रकमधून प्रवास केला. यावेळी त्यांनी ट्रकचालकांशी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस पक्षातर्फे मंगळवारी यासंबंधी माहिती देण्यात आली. राहुल गांधी ट्रकमध्ये चढताना आणि बसलेले असताना त्यांचे फोटो आणि व्हिडीओ मोठया प्रमाणात समाजमाध्यमांवर पसरले.

या प्रवासात राहुल यांनी मंगळवारी पहाटे अंबाला-चंडीगड राष्ट्रीय महामार्गावरील अंबाला शहरातील गुरुद्वारामध्ये दर्शनही घेतले. चालकांच्या 'मन की बात' एका वृत्तानुसार भारतात जवळपास ९० लाख ट्रक चालक आहेत. त्यांच्या स्वतःच्या काही समस्या आहेत. राहुल यांनी या ट्रकचालकांची 'मन की बात' ऐकली असे पक्षातर्फे सांगण्यात आले.



# सभापतीपदी बाळासाहेब क्षीरसागर तर उपसभापतीपदी गणेश डोमाडे

## लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** आशिया खंडात सर्वात मोठी उलाढाल असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी बाळासाहेब क्षिरसागर तर उपसभापतीपदी गणेश डोमाडे यांची चमत्कारिकरीत्या बिनविरोध निवड झाली आहे. लासलगाव बाजार समिती माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या मतदारसंघात येत असल्यामुळे आज होणाऱ्या सभापती निवडीकडे राज्याचे लक्ष लागून होते. बाजार समिती पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी ज्ञानेश्वर जगताप व पंढरीनाथ थोरे गटाला ९ जागा तर मा.जि.प.अध्यक्ष बाळासाहेब क्षिरसागर व जयदत्त होळकर या माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ समर्थक गटाला ८ जागा, तर एक अपक्ष विजयी झाले. भुजबळ समर्थक गटाचे ज्ञानेश्वर गांगुर्डे व सत्ताधारी थोरे व जगताप गटाचे बाळासाहेब दराडे यांना समसमान मते पडली. सोडतीद्वारे बाळासाहेब दराडे यांना विजयी घोषित केले. त्यामुळे भुजबळ समर्थक गटाचे बहुमत हुकले व विरोधी गटाला निसटते बहुमत मिळाले होते. त्यामुळे चमत्कारानेच भुजबळ समर्थक गटाचा सभापती होणे शक्य होते. त्यामुळे फोडतोडीचे राजकारण होईल असे वाटत असताना सभापती पदासाठी भुजबळ समर्थक पॅनलचे बाळासाहेब क्षिरसागर यांचा व उपसभापती पदासाठी विरोधी पक्षाचे गणेश डोमाडे यांचे एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार शरद घोरपडे यांनी घोषित केले. याप्रसंगी जयदत्त होळकर, पंढरीनाथ थोरे, ज्ञानेश्वर जगताप, दिलीप खैरे, राजेंद्र डोखळे, सुवर्णाताई जगताप, प्रकाश दायमा, डॉ. श्रीकांत आवारे, सोनिया होळकर, तानाजी आंधळे, ललित दरेकर, प्रवीण कदम, भीमराज काळे, छबुराव जाधव, राजेंद्र बोरगुडे, महेश पठाडे, बाळासाहेब दराडे, रमेश पालवे, मंगेश गवळी, समाधान जेजुरकर, प्रा.ज्ञानेश्वर दराडे, नितीन गायकवाड, कार्यकर्ते उपस्थित होते.

**राजा राज्य कमवी, दुबळा झोप गमवी :** आशिया खंडात सर्वात मोठी आर्थिक उलाढाल व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ना .छगन भुजबळ यांच्या मतदार संघात ही बाजार समिती येत असल्याने निवडणूक प्रतिष्ठेची बनली होती . त्यामुळे निवडणूक काळात मोठी चुरस पाहायला मिळाली . या निवडणुकीत सर्वच पक्षाचे विशेषत : राष्ट्रवादीचेच दोन गट तयार झाले होते . त्यामुळे गावागावात गटाचे राजकारण निर्माण झाले होते . या निवडणुकीत मोठया प्रमाणात आर्थिक उलाढाल झाल्याचीही चर्चा होती . मात्र ऐन सभापती निवडीच्या वेळी आणि त्यांनतर दोन्ही गट एकत्र जल्लोष करतांना दिसल्याने या निवडीच्या निमित्ताने राजकारणाचा अजब नमुना पहायला मिळाला आहे .




## हुंड्यासाठी केली विवाहितेची हत्या

आधुनिक केसरी न्यूज



**उमरखेड :** माहेराहून सतत पैशाची मागणी करत असताना त्याची पूर्तता न केल्यामुळे सासरच्या मंडळींनी विवाहितेची हत्या केल्याची खळबळ जनक घटना तालुक्यातील दिघडी येथे आज सकाळी 11 वाजता चे दरम्यान उघडकीस आली. या घटनेची विवाहितेच्या वडिलांनी पोलिसात तक्रार दाखल केलीण. पूजा लखन शिंदे वय 28 असे सासरच्या मंडळींनी हत्या केलेल्या विवाहितेचे नाव असून आज दि 23 च्या सकाळी 11 वाजता चे दरम्यान विवाहितेचे वडील साहेबराव देवबा पाटोदे रा. बोरगाव ( ह ) तालुका हदगाव यांना विवाहितेच्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तींनी फोन करून तुमच्या मुलीने फाशी घेतल्याचे सांगितले त्यानंतर दुपारी एक वाजता तिचे वडील दिघडी येथे पोहोचले असता त्या ठिकाणी सासरचे कोणीही उपस्थित नव्हते तर घराच्या वरच्या माळ्यावर फाशी घेतलेल्या अवस्थेत मुलीचा मृतदेह त्यांना आढळून आला. या घटनेची माहिती दिघडी येथील पोलीस पाटील यांनी पोलिसात दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेहास उमरखेडच्या शासकीय रुग्णालयात आणले. मृतक विवाहिता पूजा शिंदे हिच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी शंकर लक्ष्मण शिंदे ( सासरा ) , लखन शंकर शिंदे ( नवरा ), गोपाल शंकर शिंदे ( भाया ) बालाजी शंकर शिंदे व शरद शंकर शिंदे ( दीर , सौ. भागीरथा शंकर शिंदे ( सासू ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ठाणेदार अमोल माळवे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय अमोल राठोड, जमादार संतोष चव्हाण, सुदर्शन जाधव हे करीत आहे.



# १८ वर्षे पूर्ण होताच...

आधुनिक केसरी

आगामी निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. जागावाटपाच्या बैठकांना जोर आला असून मतदारांनाही आश्वासनांची प्रलोभने दाखवायला सुरुवात झाली आहे. दरम्यान, निवडणुकीकरता सर्वांत महत्त्वाचे असणाऱ्या मतदार याद्यांच्या अद्यायवतीकरणालाही वेग आला आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या मतदारांची नावे मतदार यादीत येण्याकरता प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. मात्र, ही प्रक्रिया सुलभ व्हावी याकरता केंद्र सरकार एक नवी पद्धत आणणार असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांनी सांगितले. एखाद्याच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होताच त्याचे नाव मतदार यादीत येण्याकरता नव्या उपाययोजना आखण्याच्या तयारीत केंद्र सरकार आहे. निवडणूक आयोग संबंधित व्यक्तीची परवानगी घेऊन त्याचं मतदान कार्ड तयार करणार आहे. तर एखाद्याचे निधन झाल्यास संबंधितांचे नाव मतदार यादीत काढून टाकणार आहे, असे शाह म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जनगणना भवनाचे उद्धाटन केले. त्यावेळी ते बोलत होते. विकासाची मूलभूत योजना तयार करण्यास जनगणनेतून प्राप्त झालेला डेटा महत्त्वाची ठरतो. तसेच, यामुळे वंचित आणि शोषितांना मूलभूत सुविधा प्रदान करणेही सरकारला सोपे जाते, असे अमित शाह म्हणाले. देशाच्या एकूण प्रगतीकरता डेटा आधारित नियोजन करणे गजरेचे आहे. हा डेटा जणगणनेतूनच प्राप्त होऊ शकतो, असेही शाह म्हणाले. मोदी सरकार आता जनगणना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करणार आहे. ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तीला डेटा भरण्याचा अधिकार असेल. व्यक्तीने भरलेल्या माहितीची पडताळणी आणि ऑडिट केले जाईल. त्यात सामाजिक-आर्थिक स्थितीचे 35 पेक्षा जास्त पॅरामीटर्स समाविष्ट असतील, असेही शाहांनी पुढे स्पष्ट केले. जन्म आणि मृत्यूची नोंद ऑनलाईन करण्याकरता संसदेच्या आगामी अधिवेशनात विधेयक आणण्यात येणार आहे. मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी निवडणूक नोंदणी विभागाकडे 'फॉर्म ६' द्वारे अर्ज करावा लागतो. यासाठी तुम्हाला काही महत्त्वाची कागदपत्रेदेखील फॉर्मबरोबर जमा करावी लागतात. फॉर्म आणि ही कागदपत्रे निवडणूक नोंदणी विभाग किंवा निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांकडे जमा करावी लागतात. यासाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत, ते म्हणजे ऑनलाईन आणि ऑफलाईन. जर या प्रक्रियेबाबत काही शंका असेल तर तुम्ही 1950 या क्रमांकावर फोन करु शकता. (या नंबरपूर्वी तुमचा एसटीडी कोड वापरण्यास विसरू नका.)



दिलीप नामदेव धायगुडे
संपर्क क्र.: ७७३८०३९११९५

# खरंच, स्पर्धा वाढली 'का' ?

आधुनिक केसरी

**स्पर्धा म्हटलं की धावपळ, दगदग, मारामारी म्हणजेच स्वतःच्या फायद्यासाठी व दुसऱ्याचे नुकसान होऊन आपल्याला लाभ व्हावा या हेतूनेही म्हणा किंवा चार चौघात एखादी समस्या मिटवण्यासाठी किंवा समोपचाराने ती मिटू शकते मग त्यासाठी प्रतिष्ठित अब्रुदार पंच असावेत. एखाद्या खेळाचा, गंभीर विषयाचा , भाग भांडवलाचा प्रश्न मिटविण्यासाठी झालेली एखादी तरतूद. स्पर्धेचे अनेक प्रकार समजून येतील; परंतु ज्या विषयांमध्ये एखाद्या प्राण्यांशी, माणसांशी, वस्तूंची स्पर्धा खेळावयाची आहे त्या प्रत्येक विषयाचं परिपूर्ण ज्ञान असावं की, तंत्रशैली पद्धतीने जर स्पर्धा जिंकायची असेल तर त्याला योग्य कसदार, ज्ञानी अशी प्रत्येक विषयातील पारंगत क्षेत्रातील तज्ञांच्या हुशारीनेच स्पर्धकाला स्पर्धा समजून येते.**

स्पर्धा कोणी, कोणाबरोबर आणि कशाप्रकारे करावी याचं भानही असावं. ती ओझरत्या किंवा एखाद्या वस्तूंचं, द्रव्याचं आमिष दाखवून नसावं. आपण जे करतो, खेळतो, वागतो, रमतो किंवा बोलतो हे स्पर्धात्मक विषयांचा एक गाभा असतो, असं म्हणा.. प्रत्येक शब्दांची चल-अचल, होकारार्थी, नकारार्थी वाक्यांची जोडणे करतानाही स्पर्धा करावी लागते ना! आज संपूर्ण देशामध्ये एवढी स्पर्धा वाढली की त्याला गणितच नाही. फार पूर्वीच्या काळी एखाद्या कंपनीत, सरकारी नोकरी, शाळा, कॉलेजमध्ये स्पर्धा दिसत नव्हती. प्रत्येक जण आपापसामध्ये एखादा प्रश्न किंवा शेतमालाच्या भाव वाढीबाबतचा दर, निश्चलीकरण कमी जास्त करून मागे पुढे सरकण्याची प्रथा अवगत होती. स्पर्धा म्हणजे काय याचा आजच्या विकसनशील दिशेने विचार केला तर, प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रगतीचा आलेख उंचावलेला पहावयास मिळतो. आज क्रीडा प्रकारांमध्ये जर पाहिलं तर क्रिकेट, कबड्डी, खो-खो, ॲथलेटिक, जिम्नॅशियम, बास्केटबॉल, फुटबॉल, टेनिस, हॉलीबॉल इत्यादींसारख्या खेळांमध्ये एवढी स्पर्धा वाढली की, चांगल्या खेळाडूंनाही बाहेर पडावं लागतं . कारण लोकसंख्या वाढली. लोकसंख्या वाढल्यामुळे एखाद्या खेळ प्रकारात आठ किंवा 11 खेळाडूंची निवड करावयाची आहे तर त्या आठ आणि 11 खेळाडूंच्या स्पर्धेकरिता आठ हजार आणि अकरा हजार स्पर्धकांची जर रीघ लागली तर स्पर्धकांचा स्तर कोणत्या प्रकारात असावा? बरं, चला जाऊ दे.. असं म्हणून समोरच्या स्पर्धकाला कमी लेखुन चालेल का? नाही, तर स्पर्धे करिता उतरणारा प्रत्येक जण हा उत्कृष्ट गुणवत्ताधारकच असेल. जेवढे स्पर्धक हवे आहेत तेवढेच मिळाले किंवा त्यांचे गुणवत्ता मूल्यांकन जर कमी असेल तर स्पर्धाही कमीच होत पण आता तसा प्रकारच शिल्लक राहिलेला नाही. शिक्षण क्षेत्रामध्ये जर पाहिलं तर वीस पंचवीस वर्षांपूर्वी पहा की, दहावी, बारावी बोर्ड परीक्षा निकाल टक्केवारी आणि आत्ताची टक्केवारी कितीतरी तफावत आढळून येते. लोकसंख्या वाढली. इतरांपेक्षा आपले गुण कसे सरस असतील म्हणून वेगवेगळ्या अभ्यासक्रमांकरिता अभ्यासिका, करून घेण्यासाठी ट्युशन लावायची. आपल्या उज्वल भविष्याचे उंच शिखर पाहण्यासाठी रात्रंदिवस मेहनत करणारे विद्यार्थी डी.एडला प्रवेश कसा मिळेल, याचं स्वप्न किंवा तसंच पुढे शिकत राहून बी.ए, बीएससी, एम.कॉम, एम. एस. सी, पर्यंतचे शिक्षण घेऊन एखाद्या अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घ्यायचा. त्याकाळी 65 - 70 ची टक्केवारी ही आज 90 - 100 च्या घरात येऊन पोहोचली. मग सांगा, किती टक्क्यांनी स्पर्धा वाढली? स्पर्धा हा शब्द फक्त शब्दच राहिला; परंतु त्या शब्दाला वास्तवात जिवंतपणाचं स्वरूपदर्शन मिळालं की, माणसांची चल-बिचल होण्याची



अवस्था निर्माण होते. 70% च्या वर मार्क्स मिळाले की डीएडला ॲडमिशन, मग तीन वर्षांचा अध्यापन कोर्स संपल्यावर जाहिरात निघाली की गुणवत्तेने डीएड विद्यार्थी पटकन शिक्षक व्हायचे, पण खरंच आता ती परिस्थिती राहिलेली नाही. आज हजारो डी.एड धारक आहेत. दिवसेंदिवस एन्ट्रान्स, टीईटी यांसारख्या परीक्षेची अट लागू झाल्याने परिस्थिती गंभीर झालेली आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्रात दहावीनंतर प्रवेश मिळायचा, तो आता जे.ई.ई यांसारख्या पात्रता परीक्षा व बारावी पीसीएम गुणांच्या आधारे प्रवेश निश्चित होतो, मग ॲडमिशन. चार-पाच वर्षांचा कोर्स संपल्यावरही वेगवेगळ्या कंपन्यांच्या जाहिराती त्यांची वार्षिक दरडोई उत्पन्न यांचा ताळेबंद करून स्पर्धेची लढाई होताना निश्चितपणे दिसत आहे. यामध्येही सरकारी कॉलेज, निमसरकारी, खाजगी कॉलेज आणि आयआयटी सारख्या प्रगतशील उच्चभ्रू गुणवत्ताधारकांना कॉलेजला ॲडमिशन मिळणं आणि मिळवणं म्हणजे खूप कसरत घ्यावी लागते. स्वप्नांच्याही पलीकडे अशी ध्येयवेडी मुलं स्पर्धेमध्ये चमकणारी पाहावयास मिळतात. आज लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केला तर भारताने चीनलाही मागे टाकले आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा असलेला देश बनला. लोकसंख्येच्या बाबतीतही स्पर्धात्मक आलेखात भारत आज अग्रेसर आहे. भारताची अर्थव्यवस्था सप्टेंबर 2022 मध्ये जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होती. म्हणजेच निर्यात - आयात यामध्येही चढा-ओढीची टक्केवारी प्रगतीच्या दिशेने आढळून येते. इतर देशांच्या तुलनेने भारताची स्पर्धात्मक आलेख उंचावल्यामुळे भारत एक महासत्ता बनवण्याचे स्वप्न नक्कीच यशोदायी ठरेल. राजकीय क्षेत्रामध्येही परिस्थिती भयानक आहे. जिथे बिनविरोध निवडणूक होत, तिथे आज एका जागेसाठी 50 ते 100 अर्ज जमा होतात. विकास कामांचा शुभारंभ करताना एखाद्या शहराचा किंवा गावचा विकास करण्यासाठी नेतेमंडळींची धावपळ पहावयास मिळते. या स्पर्धात्मक योगामध्ये ग्रामपंचायती पासून ते आमदार, खासदारांच्या निवडणुकीतून या स्पर्धेमुळे विकास झाल्याचे दिसून येते, कारण स्पर्धा असेल तरंच विकास होणार आणि विकास झाला तर उमेदवार निवडून येणार हीच राजकारणाची खरी गुरुकिल्ली. आज एवढी स्पर्धा वाढली आहे की सरकारी नोकरी मिळणे ही कठीण झाले आहे. एमपीएससी, यूपीएससी परीक्षा जरी द्यायची म्हटलं तर, दहा-बारा तास अभ्यासात सातत्य ठेवून कोणी यश मिळवितो. तर काहींना अभ्यास करूनही एक, अर्धा गुणांपासून हार पत्करावी लागते. एवढेच नव्हे तर खुल्या पोलीस, आर्मी यांसारख्या फोर्सच्या भरती बाबतही स्पर्धेची चढाओढ दिसते. 2000 जागेंसाठी तब्बल 80 ते 90 हजार तरुण-तरुणी जीवाचं रान करून मेहनत करताना दिसून येतात. जिथे ओपनचं मेरिट दोनशे पैकी 140 145 लागत असेल तर, आज च्या काळात तेच 180 च्या वर लागले जाते. ही प्रशासनाची स्पर्धा नव्हे तर बेरोजगार तरुणांची आहे. एखाद्या क्लार्क, शिपाई किंवा असिस्टंट पदासाठी ऑनलाइन अर्ज मागवले तर लाखोने अर्ज उपलब्ध होतात. मग त्यांची छाननी करून पाच, दहा जागेकरिता पंधरा ते वीस हजार मुलांची मुलाखत घेऊन शिक्षण आणि गुणवत्तेच्या आधारावर निवड प्रक्रिया राबवली जाते. शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या भाव वाढीतही स्पर्धा दिसून येते. त्या शेतीला जर वेळोवेळी खत, पाणी, फवारणी करून तंत्रज्ञानाच्या आधारे शेतीची जर मशागत केली तर उत्पादन वाढीचा दरही वाढतो, मग त्यासाठी एकच शेतकरी नव्हे तर या देशातील प्रत्येक शेतकरी राजा स्पर्धेच्या युगात लढताना दिसून येतो. बांधकाम व्यवसायिकांमध्येही चढाओढ दिसते, म्हणजेच प्रत्येक जण आपापल्या बिल्डर लॉबीचा महासंग्राम लढून बांधकाम शैलीचा डांगोरा उभा करतात.

पूर्वीच्या काळी एखादे काम करावयाचे असेल तर, दहा माणसांची गरज होती. पण आजच्या या विज्ञान युगात इंटरनेटच्या साह्याने एकच कंम्प्युटर हजारो माणसांचे काम करू लागले. मोबाईल, टी.व्ही, फ्रिज, रोबोट हे सर्व स्पर्धात्मक युगातले खरे वारसदार म्हणावे लागतील. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर निर्णय क्षमता, विचार करण्याची पद्धत, डिजिटल साक्षरता, जुळवून घेण्याची क्षमता, लवचिकता, सर्जनशीलता, तणाव व्यवस्थापन, नेतृत्व गुण, भावनिक बुद्धिमत्ता इत्यादी कला कौशल्य असणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर सतत शिकत राहणे त्यामुळे मनामध्ये सकारात्मक ऊर्जा तयार होऊन येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात होऊन प्रगतीची दारे खुले राहतील. बुद्धिमत्ता जागृत ठेवून एकाग्रता आणि संयम यांचा मेळ बसवून जर विचार केला तर, खरंच, स्पर्धा वाढली 'का' या प्रश्नाची उकल नक्कीच समजून येईल आणि स्पर्धेच्या युगातील टिकाऊपणा हा नेहमी अग्रस्थानी असेल. चला तर मग..

**"स्पर्धेच्या युगात लढूया**
**प्रयत्नांशी एकनिष्ठ राहूया."**



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# महाराष्ट्राची मान उंचावली

आधुनिक केसरी

**केंद्रीय लोकसेवा आयोगाचा म्हणजेच यूपीएससी परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून या परीक्षेत ९३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेसाठी देशभरातून लाखो विद्यार्थी बसले होते त्यातील फक्त ९३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले यावरून ही परीक्षा किती कठीण असते हे लक्षात येईल. ही परीक्षा देताना अनेकांचा कस लागतो. ही परीक्षा उत्तीर्ण होणे हे मोठे दिव्यच असते कारण देशातील सर्वात कठीण परीक्षा म्हणूजे यूपीएससीची परीक्षा असे मानले जाते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी देशाचा प्रशासकीय गाडा हाकतात म्हणजे ते देशाचे प्रशासन चालवतात. यातील उत्तीर्ण विद्यार्थी आयुक्त, उपायुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, सचिव या पदावर काम करतात आणि देशाला उज्वल भविष्य मिळवून देतात.**

या परीक्षेत पूर्वी दक्षिण भारतीय विद्यार्थ्यांचे वर्चस्व होते मराठी विद्यार्थी नाममात्र असत मात्र गेल्या काही वर्षांपासून हे चित्र बदलले आहे. या परीक्षेत आता महाराष्ट्रातील विद्यार्थी देखील चमकू लागले आहेत. या वर्षी लागलेल्या निकालात महाराष्ट्रातील तब्बल ७० विद्यार्थ्यांनी बाजी मारली. उत्तीर्ण होणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी जवळपास बारा टक्के विद्यार्थी हे मराठी आहेत याचा तमाम महाराष्ट्राला अभिमान आहे. या मराठी विद्यार्थ्यांच्या यशाने महाराष्ट्रची मान अभिमानाने उंचावली आहे. विशेष म्हणजे बहुसंख्य विद्यार्थी हे मध्यमवर्गीय किंवा निम्न मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत. काही विद्यार्थी शेतकरी वर्गातील तसेच दलित, वंचित घटकातील आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी बहुतेक सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षण हे मातृभाषेतून झाले असून प्राथमिक शिक्षण हे सरकारी शाळेतून झाले आहे. मराठी माध्यमाला आणि सरकारी शाळांविषयी नाके मुरडणाऱ्यांसाठी ही मोठी चपराक आहे. जिद्द, मेहनत आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर जगात काहीच अशक्य नाही हेच या ७० विद्यार्थ्यांनी दाखवून दिले आहे. यातील बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी तर कोणताही क्लास न लावता घरीच अभ्यास केला होता. विद्यार्थ्यांच्या या यशात सारथी, बार्टी, महाज्योति या संस्थांचा देखील वाटा आहे या संस्थेत जाऊन यूपीएससीची तयारी करणारे बरेचसे विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. या संस्थांनी विद्यार्थ्यांना हवे ते सर्व संदर्भ साहित्य पुरवले व योग्य असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी त्याचा पुरेपूर लाभ घेतला आणि हे यश मिळवले. या निकालाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या निकालात नेहमीप्रमाणे मुलींनी बाजी मारली. पहिल्या दहा क्रमांकात सहा मुली आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी मुलींचा टक्का मुलांपेक्षा अधिक आहे ही निश्चित चांगली बाब आहे. मुलींची ही अभिमानास्पद कामगिरी निश्चितच प्रेरणादायी आहे. एक मुलगा शिकला तर तो एकटा शिकतो पण जर मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते असे महात्मा फुले म्हणायचे. मुलींना संधी दिल्यास त्या मुलांपेक्षा कमी नाही हे दाखवून देतील असेही महात्मा फुले म्हणायचे आज या सावित्रीच्या लेकींनी त्यांचे हे वाक्य खरे करून दाखवले. मुलींना नकोशी समजून गर्भातच मारून टाकणारे महाभाग आजही समाजात आहे. या महाभागांनी मुलींचे हे यश पाहावे म्हणजे त्यांना समजेल की मुलांपेक्षा मुलीच बऱ्या. या मुलींचे हे यश समाजातील इतर मुलींसाठी प्रेरणादायी आहे. या यशस्वी मुलींकडून प्रेरणा घेऊन भविष्यात आणखी मुली या प्रशासकीय सेवेत येतील. यूपीएससी सारख्या कठीण परीक्षेत महाराष्ट्राचा झेंडा अभिमानाने फडकवणाऱ्या या यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि सावित्रीच्या लेकींचे मनापासून अभिनंदन!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील वैजापूर हद्दीत दि.२३/५/२३ मंगळवार रोजी जिल्हा ग्रामीण पोलीस दल व जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी द्रौपदी लान येथे तालुक्यात" ग्राम सुरक्षा यंत्रणा"कार्यान्वित करण्यासाठी लोक जागृती कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा पोलिस अधीक्षक मनीष कलवानीया व जि.प. कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या प्रयत्नातून वैजापूर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संजय लोहकरे यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. यात वैजापूर उपविभागाच्या पोलीस अधिकारी महक स्वामी, उपजिल्हाधिकारी राहुल गायकवाड, शांतता

समिती सदस्य प्रकाश बोथरा व धोंडीरामसिंह राजपूत यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. आरंभी ग्राम सुरक्षा यंत्रणा संचालक डी.के.बोर्डे यांनी चित्रफितच्या सहाय्याने पोलिस स्टेशनच्या हद्दीत संकट काळात, आपत्तीग्रस्त काळात, चोरी, दरोडे, असामाजिक घटना, महिला छेड- छाड, लहान मुले हरविणे, वाहन चोरी, गंभीर अपघात, आग, जळीत घटना, इत्यादीमध्ये ग्रामसुरक्षा यंत्रनेच्या वापरामुळे तातडीने मदत मिळते, दुर्घटनाना आळा घालणे प्रभावी पणे शक्य होत आहे, आपल्या पोलिस स्टेशनच्या हद्दीत ग्रामसुरक्षा यंत्रणाचा टोल फ्री मो, नंबर 18002703600 वर संपर्क साधल्यास संबंधित व्यक्तीचा आवाज गावतील सर्व नागरिकांना कॉल स्वरूपात तात्काळ एकविला जाणार आहे. यामुळे तात्काळ मदत मिळून, गुन्हे, दरोडे, चोरी, वाहन चोरी, लहान मुले हारविणे, महिला गुन्हे, छेड छाड याला आळा बसेल, या नंबरचा वापर करावा वपोलीस यंत्रणेस सहकार्य करावे असे आवाहन या कार्यक्रमात करण्यात आले. या यंत्रणेमूळे बऱ्याच विघातक व विघ्न संतोषी घटनांना आळा बसेल, या प्रसंगी सहायक पोलिस अधिक्षिका महक स्वामी व तहसीलदार राहुल गायकवाड यांनी ही उपस्थिताना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व आभार पोलीस निरीक्षक संजय लोहकरे यांनी केले. सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. ही यंत्रणा पोलीस हद्दीत कार्यान्वित करण्यास प्रति कुटुंब प्रति वर्ष ५०खर्च आहे. हा खर्च १५व्या वित्त आयोगातून ग्रामपंचायत ने करावा अशा सूचना जि.प.ने दिल्या आहेत. ही यंत्रणा पुणे, सातारा, नगर, उस्मानाबाद, सोलापूर जिल्ह्यात चालू आहे. यामुळे या जिल्हयात अनेक बाबींचा आळा बसला आहेत प्रसंगी प्र. गट विकास अधिकारी एच.आर. बोयणर, स.पो.नि. विजय नरवडे, सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी धोंडीराम ध राजपूत वैजापूर, कल्याण पवार, ग्राम सुरक्षा यंत्रणाचे वरीष्ठ विभागिय अधिकारी गणेश लोकरे, जिल्हा समन्वयक मकरंद कदम, गोपनीय शाखेचे विजय घोटकर, गणेश पैठणकर, गणेश पठारे, सूर्यकांत मोटे, राम पिलदे, ठुबे, तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, सदस्य, ग्रामसेवक, आशा वर्कर, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह ग्रामस्थ हजर होते.



## नव्या संसद भवनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नव्या संसद भवनाला महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे आणि जे 28 मे रोजी संसद भवनाचे उद्घाटन होणार आहे ते रद्द करून 26 नोव्हेंबरला संविधान दिनी करण्यात यावे ही ऑल इंडिया पॅंथर सेनेची मागणी असून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी उपस्थित जिल्हा अध्यक्ष सागर मोहिते, जिल्हा उपाध्यक्ष निलेश इंदवे, आनंद अमृतसागर, भाऊसाहेब बळसाने, यश बागुल, पै.सलमान खान, रोहित वाघ, जितु भदाणे, समाधान मंगळे व अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## केंद्रीय प्राथमिक शाळेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या अनुषंगाने पायाभूस्तर शिक्षण उद्बोधन वर्गाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे जि.प.प्रार्थमिक शाळेत आज दि.24/05/2023 सकाळी 7.30 ते 1 ला केंद्रीय शाळा सावळदबारा येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अनुषंगाने पायाभूत स्तर शिक्षण उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जफर भाई तडवी यांच्या शुभहस्ते व प्रभारी केंद्रीय मुख्याध्यापक श्री गवई सर यांनी प्रशिक्षणाची रूपरेषा व प्रास्ताविक करून (कार्यक्रमाला) प्रशिक्षणाला सुरुवात करण्यात आली केंद्रप्रमुख एस.बी.राठोड मॅडम सावळदबारा व संगीता पाटील मॅडम यांनी सखोल असे मार्गदर्शन केले. सावळदबारा येथे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर व्ही.पी.राजपूत साहेब यांनी मार्गदर्शन केले व प्रशिक्षणाचे अवचित साधून आधार अपडेट बाबत गणेश सवकर (आप्पा) यांनी पण सर्वांना योग्य ते मार्गदर्शन केले आपण प्रत्येक ठिकाणी आधार अपडेट बाबत कॅम्प लावून ताबडतोब दुरुस्ती करून घेऊया असे सांगितले. अंगणवाडी सेविका ताई त्याचप्रमाणे काही जेष्ठ शिक्षक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तसेच या कार्यक्रमाला सर्व शाळेचे मुख्याध्यापक व सर्व अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.सुत्रसंचालन गजानन गवयी व तेली सर यांनी केले व आभार प्रदर्शन सरप सर यांनी केले अशा पद्धतीने उद्बोधन वर्ग प्रशिक्षण पार पडले.



## न्यूज जी ९ च्या वर्धापनदिन दिनानिमित्त पत्रकार रहीम खान व शामका चव्हाण सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील पत्रकार रहीमखॉन, सौ.शामका प्रदिप चव्हाण, शेख नदीम व मो.तालिब मो.शब्बीर(सामाजिक कार्यकर्ते) यांना न्युज जी ९ महाराष्ट्र वृत्तवाहिनीचा नऊ वा वर्धापण दिन सोहळा निमित्ताने यांना शाल श्रीफळ देऊन व सन्मान चिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले. नुकत्याच नाशिक येथे न्युज जी ९ महाराष्ट्र या वृत्तवाहिनीचा नऊ वा वर्धापण दिन सोहळा २२ मे २०२३ सोमवार रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्धापण दिन सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारत सरकार डॉ. भारतीताई पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सौ. देवयानी फरांदे हे व प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार सय्यद, न्यूज जी ९ महाराष्ट्र




वृत्तवाहिनीचे मुख्यसंपादक शाहीद मुलतानी, तसेच न्युज जी ९ महाराष्ट्र चे प्रतिनिधी महाराष्ट्रभरातून मोठ्या संख्यने उपस्थित होते. या वर्धापण दिन सोहळ्यामध्ये जी ९ च्या प्रतिनिधींना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना विविध पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेख नदीम सिल्लोड व रहीम पठाण सोयगाव शामका प्रदीप चव्हाण सोयगाव मुस्तफा खान पठाण भोकरदन जालना यांना उत्कृष्ट पत्रकार गौरव पुरस्कार न्यूज जी नाईन महाराष्ट्र संपादक शाहिद मुलतानी यांच्या हस्ते देण्यात आले आणि यांना सम्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. वर्धापन दिनानिमित्त सोयगाव तालुक्यातील प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप चव्हाण नादांतांडा उपस्थित होते. वरील पत्रकार बंन्धू यांना सर्वोकृष्ट महात्मा फुले या पुरस्कारांने गौरविण्यात आले. अनेक मान्यवरांनी यावेळी आपल्या मनोगतात आपले कार्य व पत्रकारीता याबद्दल अनुभव व्यक्त केले वरील सर्व मान्यवरांचे व पत्रकार बंन्धू रहीम खान पठाण, शेख नदीम, सौ.शामका चव्हाण व मो.तालिब मो. शब्बीर (सामाजिक कार्यकर्ते)याचे सोयगाव, फर्दापूर व सावळदबारा परिसरातून कौतुक करुन अभिनंदनचा वर्षाव होत आहे.




महाराष्ट्र Business Katta












# नागरिकत्व



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**आपल्या संविधानातील 'भाग दोन' हा नागरिकत्वासंदर्भात आहे. या भागात 'भारताची नागरिकता' कोणाकोणाला लागू आहे, ती कशी मिळते वा काढून देखील कोणकोणत्या कारणांनी घेता येते, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. भाग दोन मधील अनुच्छेद-५ ते ११ अशा एकूण ७ अनुच्छेदांमध्ये याबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. यापैकी अनुच्छेद-५ ते ८ यादरम्यान सर्वसाधारणपणे एकाच प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे आणि ते म्हणजे, संविधानाच्या प्रारंभी, म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी नेमक्या कोणकोणत्या व्यक्तींना आपल्या देशाची नागरिकता देण्यात येईल. आता ह्या अनुच्छेदांकडे वळण्याआधी नागरिकता म्हणजे नक्की काय? हे आपण प्रथमतः बघुया....**


**अनुच्छेद-५:- संविधानाच्या प्रारंभीचे नागरिकत्व** : या संविधानाच्या प्रारंभी, भारताच्या राज्यक्षेत्रात ज्या व्यक्तीचा अधिवास आहे आणि-

१) जी भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मली होती; किंवा

२) जिच्या मातापित्यांपैकी कोणीही एक भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मले होते; किंवा ३) जी अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी किमान पाच वर्षे इतका काळ भारताच्या राज्यक्षेत्रात सामान्यतः निवासी आहे, अशी प्रत्येक व्यक्ती भारताची नागरिक असेल.

अनुच्छेद-५ चे शीर्षक हे 'संविधानाच्या प्रारंभी नागरिकत्व' असे आहे. यावरून आपल्या लक्षात आलेच असेल की, या अनुच्छेदामध्ये नागरिकतेबाबत ज्या काही तरतुदी करण्यात आलेल्या आहेत, त्या संविधानाच्या प्रारंभी भारतीय नागरिकत्व हे नक्की कोणाकोणाला देता येईल, याविषयी आहेत. संविधानाचे प्रारंभी म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी नेमक्या कोणकोणत्या नागरिकांना भारतीय नागरिकत्व दिले जाईल, याविषयी स्पष्ट तरतूद अनुच्छेद-५ मध्ये करण्यात आलेली आहे.

अनुच्छेद-५ नुसार संविधानाच्या प्रारंभी म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय नागरिकता मिळवण्यासाठी केवळ दोनच अटींची पूर्तता करणे गरजेचे होते. पहिली आणि अनिवार्य असणारी अट होती ती अधिवासाची. अनुच्छेद-५ च्या सुरुवातीलाच स्पष्टपणे म्हटले आहे की, 'भारताच्या राज्यक्षेत्रात ज्या व्यक्तींचा अधिवास आहे...' म्हणजेच भारतीय नागरिकता मिळवण्यासाठी अधिवास हा कंपल्सरी माणण्यात आलेला आहे. आता हा अधिवास म्हणजे




नक्की काय? तर ज्या स्थानावर आपण आजीवन कायमस्वरूपी राहणार असतो, त्या स्थानावर आपला अधिवास असल्याचे मानले जाते. थोडक्यात, ज्या ठिकाणी आपले कायमस्वरूपीचे म्हणजेच पर्मनंट निवासस्थान असते, ती जागा. अनुच्छेद-५ मधील संविधानाच्या प्रारंभी नागरिकत्व प्राप्त करण्यासाठी अधिवासाच्या पहिल्या अनिवार्य अटीसोबत अनुच्छेद-५ मध्येच देण्यात आलेल्या विविध तीन पैकी कोणत्याही एका अटीची पूर्तता करणे गरजेचे होते. म्हणजेच भारतातील कायमस्वरूपी वास्तव्यासह अनुच्छेद-५ च्या उपखंड (क) नुसार, त्या व्यक्तीचा जन्म भारताच्या राज्यक्षेत्रात झालेला असावा किंवा उपखंड (ख) नुसार, जर त्या व्यक्तीचा जन्म भारताच्या राज्यक्षेत्रात झालेला नसेल, तर तिच्या आई किंवा वडिलांपैकी कोणा एकाचा तरी जन्म भारताच्या राज्यक्षेत्रात झालेला असावा किंवा उपखंड (ग) नुसार, ती व्यक्ती संविधान लागू होण्याच्या लगतपूर्वी किमान पाच वर्षे एवढा काळ भारताच्या राज्यक्षेत्राची रहिवासी असावी. म्हणजेच ती व्यक्ती किमान जानेवारी १९४५ पासून भारताच्या राज्यक्षेत्राची रहिवासी असावी. अशाप्रकारे भारतातील अधिवासासह अनुच्छेद-५ च्या उपखंड (क), (ख) व (ग) मध्ये देण्यात आलेल्या तीनपैकी कोणतीही एक अट पूर्ण करणारी व्यक्ती, ही अनुच्छेद-५ नुसार संविधानाच्या प्रारंभी म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी भारताची नागरिक असल्याचे मानली जाणार होती. अनुच्छेद-५ ची अंमलबजावणी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी पासूनच तात्काळ करण्यात आली होती. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अनुच्छेद-३९४ हा तात्काळ लागू करण्यात आला होता. या अनुछेद-३९४ नुसार तात्काळ लागू करण्यात येणाऱ्या विविध १५ अनुच्छेदांमध्ये अनुच्छेद-५ देखील होता.

# व्यथा नोकरी करणाऱ्या जोडप्याची



सीमा गाडेकर
मो. 9423172305

आधुनिक केसरी

**नोकरी करणारे जोडपे म्हटलं की ...त्यांचं काय बुवा डबल पगार, डबल इंजिन, त्यांना पैशाची काय कमी ?? एकाचा पूर्ण पगार घर चालवण्यासाठी खर्च केला तरी एकाचा पगार तसाच शिल्लक रहात असेल?? दोनच मुलं आणि ती दोघं असा सुखाचा संसार थोडक्यात काय तर राजा-राणीचा संसार?? असं सर्रासपणे कानावर पडत असतं कारण लोक असेच बोलतात हीच मुलं लहानाची मोठी करताना नोकरदार जोडप्याची होणारी धावपळ कोणाला दिसत नाही... मुलांच्या संगोपनात त्यांच्या आजारपणात रात्रीचा केलेला दिवस पुन्हा सकाळी ऑफिसला कोणी जायचं?? आणि घरी मुलाजवळ कुणी थांबायचं हा निर्णय घेताना एक आई म्हणून आपल्या तापाने फणफणलेल्या इवल्याशा जिवाला नवऱ्याजवळ सोडून जाताना तिने काळजा वर ठेवलेला दगड कुणालाच दिसत नाही..**

लेकराच्या काळजीपोटी एकांतात ढाळलेले तिचे अश्रू कुणालाच दिसत नाही... तिच्या इतकाच त्याग करून लेकराच्या संगोपनात तिला मदत करणारा तिचा नवरा, प्रसंगी स्वतःची सर्व कामे बाजूला ठेवून बायकोला धीर देणारा तिचा नवरा कुणालाच दिसत नाही.... मुलांच्या संगोपनाची तडजोड स्वीकारत जगणार, घड्याळ्याच्या काट्यावर धावणारं, यंत्रवत जीवन जगणार हे जोडपं कोणालाच कसं दिसत नाही दिसतो फक्त त्यांच्या घरात येणारा डबल पगार.. म्हणजेच काय पैसा..

मुलं थोडी कळती झाली की त्यांना शाळेत टाकतानाही दोघांच्या नोकरीच्या वेळा व शाळेची वेळ हे सगळं कसे अड्जस्ट होईल अशी शाळा निवडावी लागते. कारण मुलं शाळेतून घरी आल्यावर त्यांना कोण सांभाळणार ?? हा यक्ष प्रश्न सतत भेडसावत असतो. नोकरीच्या ठिकाणीही मुलांना नेता येत नाही कारण हा प्रश्न काही दिवसात सुटणारा प्रश्न नसतो ... तर हा प्रश्न असतो वर्षानुवर्षाचा ... म्हणजे वर्षानुवर्षे या जोडप्यांनी तडजोड करत जीवन जगायचं.. शाळा सुटल्यावर दोन-तीन तासाचा प्रश्न उरतो तो सोडवण्यासाठी हृदयावर दगड ठेवून नाईलाजाने पाळणाघरात सारखा पर्याय निवडावा लागतो .. मग सुरु होते धडपड चांगलं पाळणाघर शोधण्याची.. त्यांची ही धडपड ही कुणालाच दिसत नाही.. आपल्या काळजाच्या तुकड्याला पाळणाघरातील एखाद्या परक्या मावशीच्या स्वाधीन करताना एका आईची होणारी घालमेल तिची काळजी कुणालाच दिसत नाही ???

पाळणाघरातील ती मावशी आपल्या बाळाला व्यवस्थित सांभाळेल ना ? आपल्या बाळाला पोटभर खाऊ घालेल ना ? अशा कित्येक प्रश्नाचं चक्र अविरत तिच्या डोक्यात फिरत असतं... जे कुणाच्याच दिसत नाही.... एक नोकरदार आई जेव्हा विचार करते ना की माझा सोनुला सकाळी आठ वाजल्यापासून सायंकाळी सहा वाजेपर्यंत माझ्या पासून दूर राहणार आहे तेव्हा त्या सोनुल्या च्या आवडीचे पदार्थ करण्यासाठी रोज पहाटे पाचला उठून विनाखंड स्वयंपाक करून आपल्या मुलांना शाळेत जाण्याआधी आपल्या हातानं प्रेमाने चार घास खाऊ घालण्यासाठी तिने केलेली धडपड कोणालाच दिसत नाही... ऑफिसला उशीर होईल म्हणून किचन ओट्यावरच उभ्यानेच जेवण करणारी ती कुणालाच दिसत नाही. संध्याकाळी ऑफिस मधून थकून घरी आल्यावरही मुलांच्या आवडी जपत स्वयंपाक करणारी ती कुणालाच दिसत नाही... शेजारच्यांना ऐकायला येतो तो फक्त रोज पहाटेच तिच्या किचन मधून येणारा खलबत्त्याचा आणि कुकरच्या शिट्ट्यांचा आवाज..... कोणालाच दिसत नाही तीच सलग अठरा अठरा तास राबने... आणि आपल्या संसारासाठी चंदना सारखं झिजणे... एवढे करूनही कसं कसं सांगू माझ्या सखींना तुम्हाला.. इतर स्त्रियांच्या तुलनेत आम्ही नोकरी करणाऱ्या स्त्रिया आपल्या मुलांना खूप कमी वेळ देतो ही सल आमच्या मनाला सतत आतून बोचत असते.. सायंकाळी ऑफिस सुटलं की कधी एकदा घरी जाऊन आपल्या सोनुल्याचा निरागस चेहरा पाहते अस तिला होऊन जातं यासाठी हरणाचे पाय लावून घर गाठणारी आई कुणालाच दिसत नाही.... म्हणतात ना जरी घार फिरे आकाशी चित्त तिचे पिलापाशी या उक्तीचा प्रत्यय अशावेळी आमच्या मनात आल्याशिवाय रहात नाही... पण कुणालाच दिसत नाही... नोकरी करणाऱ्या जोडप्यांची तडजोड, त्यांची तारेवरची कसरत, त्यांनी मन मारून जगलेलं त्यांचं जीवन ,मुलांच्या चांगल्या जीवनासाठी त्यांनी केलेला त्याग... लोकांना दिसतो तो फक्त त्यांचा बंगला ,त्यांची गाडी आणि त्यांचा पैसा... पैसा... आणि फक्त त्यांचा पैसा...

आपल्याला हा लेख कसा वाटला.. आवश्य प्रतिक्रिया पाठवा... ही विनंती. मी आपल्या प्रतिक्रियेची वाट पाहत आहे...



# यूपीएससीत यशस्वी झालेल्यांचे अभिनंदन पण...



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**अधिकाऱ्यांचे राज्य अधिकाऱ्यांचे गाव कुटुंब असा ऐकायला सगळ्यांनाच चांगलं वाटतं . या बाबतीत विशेष प्रयत्न प्रोत्साहन,अनुभव मार्गदर्शन तशी वातावरण निर्मिती खुप आवश्यक आहे. आपल्या राज्यात जिल्ह्यातील गावातील कुटुंबातील मुलगा ,मुलगी अधिकारी व्हावे यासाठी आपण वातावरण निर्मिती करण गरजेचे आहे. मुळात वातावरण निर्मिती मुलं घडण्यासाठी आधारभूत ठरते.पण आपल्याकडं मुलांचं अहित कसं होईल अशीच वातावरण निर्मिती जास्त केली जाते त्याला प्रतिसाद चांगला मिळतो.हिताच्या बाबी कड फार कोणाचंही लक्ष नाही हे दुर्दैव आहे. तरूणांची माथी भडकवुन त्यांना उध्वस्त करण्या ऐवजी त्यांच्या कडुन देशसेवा कशी करून घ्यावी हे महत्त्वाचे आहे.**

देशातील प्रतिष्ठित व सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या भारतीय प्रशासन सेवेच्या संदर्भात भारतीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या 2022 या कालखंडातील स्पर्धा परिक्षेचा अंतिम निकाल आज घोषित झाला आहे . त्या मध्ये महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळ्या विभागातील वेगवेगळ्या प्रवर्गाचे ब-यापैकी उमेदवारांनी बाजी मारत यशोशिखरावर गाठलं आहे. हि अभिनंदनीय व अभिमानाची बाब आहे.पण या पेक्षाही अधिक यश मिळवणे अपेक्षित होते आपला मराठी टक्का वाढला पाहिजे हि बाब खुप महत्वाची आहे. जे यशस्वी झाले आहेत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. ज्यांच्या वाट्याला यश आलं नाही त्यांनी तणाव न घेता पुन्हा एकदा नव्या दमाने अभ्यास करत तयारी करावी. आणि यशाचं शिखर गाठण्यासाठी नव्या दमाने कामाला लागावं . एकंदरीत देशाच्या दृष्टीने महत्वाच्या असणार्या या परिक्षेत मराठी टक्का कसा वाढेल यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न चर्चा मार्गदर्शन होण गरजेच आहे. जास्तीत जास्त जागा आपण कशा पटकावु शकतो यासाठी राज्यभरातील गावा गावात गल्ली गल्लीत या संदर्भात चर्चा झाली पाहिजे.जे यशस्वी झाले त्यांच्या कडुन योग्य प्रेरणा घेऊन उर्वरित नवयुवकांनी आपला जीवन यशस्वी करण्यासाठी मंथन चिंतन केलं पाहिजे.या जगात कठिण काहिच नसतं . फक्त आपण कमी पडतो .पण आता कमी पडता कामा नये उमेद न हरता आपण आपलं अनमोल वेळ रिकाम्या बाबींवर खर्च करतो .रिकामं टेकड्या गप्पा मारतो नको तिथे टाईमपास करतो .पण ज्या माध्यमातून समाजाचा विकास होऊ शकतो. समाजिक कौटुंबिक उत्थान होऊ शकत तिथे मात्र आपण लक्ष देत नाही अथवा त्या विषयावर फोकस करत नाही. तसं पाहिलं तर महाराष्ट्र राज्याचे देशाच्या एकंदरीत




विकासात खुप मोठ योगदान आहे. अनेक महापुरुष महाराष्ट्र राज्याने या देशाला दिले मग याच महाराष्ट्र राज्यातील विद्यमान तरूण पिढीने सुद्धा प्रशासकीय सेवेत सुद्धा आपला दबदबा निर्माण करणं गरजेचं आहे.यासाठी अगदी प्राथमिक शिक्षणापासून मुलांची मानसिक तयारी अभ्यास नियोजन त्या बाबतीत पुर्व कल्पना म्हणजे जवळपास प्राथमिक तयारी अगोदरच होण गरजेच आहे.समाज माध्यम सोशल मिडिया कौटुंबिक पातळीवर सामाजिक पातळीवर याची चर्चा होऊन मुलांना प्रोत्साहन दिलं गेलं पाहिजे. पण आपल्याला कड असं होतं नाही राजकिय चर्चा,नको तो विवाद कौटुंबिक पातळीवरील वाद विवाद तसेच शालेय जीवनात गुंड वृत्तीचा प्रवेश अभ्यासाकडे दुर्लक्ष ह्या सगळ्या बाबी पालक ,शिक्षक ,आई वडील समाज उघड्या डोळ्यांनी पाहत राहतात आणि मग शेवटी अंतिम निकालात गुणवत्ता विद्वत्ता बुद्धिमत्ता याचा जेव्हा कसं लागतो तेव्हा मात्र मुलं कमी पडतात याला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे अनेक घटक कारणीभूत आहेत. कुठेतरी बदल झाला पाहिजे आपण करू शकतो यशस्वी होऊ शकतो हा आत्मविश्वास या निमित्ताने जागा झाला पाहिजे. भविष्यात या पेक्षाही दैदिप्यमान यश संपादन करण्यासाठी सगळ्याच घटकांनी आप आपल्या ठिकाणी योग्य योगदान देण अपेक्षित असतं . बेकारांची फौज निर्माण करण्या ऐवजी अधिकार्यांची फौज निर्माण झाली पाहिजे यासाठी पोषक असं वातावरण सामाजिक पातळीवर तर अपेक्षितच आहे पण समाजाच्या वेगवेगळ्या माध्यमांतून सुद्धा यावर जाणीव पुर्वक प्रकाश टाकला गेला पाहिजे. जितकी जास्त सकारात्मक चर्चा होईल तितकी जास्त मुल त्या दिशेने मार्गक्रमण करतील व बहुसंख्य मुलं यशस्वी होतील या मध्ये एतकिंचित सुद्धा शंका नाही.

# सावरकरांनी अंदमानमध्ये भोगलेल्या यातना



अशोक राणे, अकोला
मो. 9423658385

आधुनिक केसरी

**भारतमातेच्या मुक्तीयज्ञात आपल्या सर्वस्वाची आहुती देणारे स्वातंत्रवीर सावरकर या युगातील एक महानायक तथा उच्च कोटीचे देशभक्त होऊन गेले आहेत. हिंदुत्व आणि राष्ट्रवाद त्यांची वैचारिक बैठक पक्की होती. क्रांतिकारकांचे मुकुटमणी ते समाजसुधारक असा त्यांचा प्रवास या मातीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक देशभक्त नागरीकास प्रेरणा देणारा आहे. सोबतच थक्क सुद्धा करणारा आहे. वीर सावरकर इंग्लंड येथे शिक्षण घेत असतांना इंग्रजी साम्राज्या मध्ये सिंहाच्या गुहेत राहून हिंदुस्तानच्या राष्ट्रदेवतेच्या स्वातंत्र्याची दहाड देण्याच साहस त्यांनी दाखविले होते.**





पाण्यामध्ये राहून मगरी सोबत शत्रूत्व करता येत नाही पण त्यांनी शत्रूत्वाचे आव्हान स्विकार करून हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचे बिगुल शत्रूच्या भूमीवरच फुंकले तथा इंग्लंडच्या इज्जतीचे लकतरे काढणारे ऐकमेव क्रांतिकारक होते. मार्सोलिस बंदरातील उडी आणि काळ्यापाण्याची सजा हिंदुस्तान कधीच विसरू शकत नाही. अंदमानमध्ये त्यांनी भोगलेल्या यातना व त्यांचा झालेला छळ हा सुद्धाविषय कुतुहलाचा विषय आहे. पण आज काही देशातील तथाकथित बाजारू विचारवंताची अनौरस पैदास किवा स्वंयघोषित बेगडी मंडळी सावरकरांच्या अंदमानमधील यातना व छळ -चेष्टेचा विषय ठरवू पाहत आहेत. एवढच नव्हे तर स्वातंत्र लढयातील योगदानच नाकारण्यचा केविलवाणी प्रयत्नसुद्धा करीत आहेत. ही मंडळी अंदमानतील यातना आणि छळला बगल देऊन माफीवीर सावरकर असा उपहासात्मक अजेंडा राबवित आहेत. हिंदुस्थानच्या गल्लीबोळात आपल्या गटारात वळवळ वळवळ करणारी सडकछाप मंडळी त्यांची टिंगलटवाळी करण्यात धन्यता मानत आहेत.

काही प्रसारमाध्यमे सुद्धा त्यांच्या अजेंडायाला मुख संमती देऊन "सावरकर नायक की खलनायक"अशा प्रकारच्या तथ्थहीन चर्चा वृत्त वाहिन्यावर आयोजित केल्या जातात वर्तमानपत्रे सुद्धा सावरकर विरोधी वक्तव्याना प्रसिद्धी देतात ही लाजीरवाणी बाब म्हणावी लागेल. वास्तविक पाहता ज्यांनी आयुष्यभर आपल्या रक्ताचा सळा शिंपडून राष्ट्रदेवतेची आराधना केली. अशा राष्ट्रभक्ताची अवहेलना होत असेल तर या पेक्षा दुर्दैव कोणते होऊ शकते. तसेच त्यांनी अंदमानमध्ये देशा साठी भोगलेल्या यातना आणि झालेला छळ नाकारण्याचा करंटेपणा करणे कितपत योग्य आहे याचा विचार करावा लागेल. अंदमानच्या कालकोठडीत रवानगी महानायक सावरकर यांनी देशासाठी शारिरीक कष्ट सामाजिक उपेक्षा आणि अवहेलना सहन करून प्रचंड कष्ट केलेले आहेत. तसेच मोठी मोठी वादळ सहज पचवली आहेत. अशा वादळाना तुडवून ते कालजयी ठरलेले आहेत. इंग्लंडमध्ये शिक्षण सुरू असताना मदनलालधिंगरा यांनी कर्झन वायलीचा मुडदा पाडला. त्यामुळे हिंदुस्तानमधील सावरकर संबधितांचा छळ सुरू केला गेला. अनेकवर देशभक्तावर खोटे खटले भरण्यात आले. तर अनेकांना काहीच गुन्हा नसतांना कारागृहात टाकले सावरकरांचे बंधू बाबरावसावरकर यांना जन्मठेप सुनावली गेली. त्यामुळे क्रांतिकारात असंतोषाची लाट पसरली सामान्य माणसामध्ये सुद्धा असंतोष खदखदू लागला. सावरकरांचे शिष्य अनंत कान्हेरे यांनी या अन्यायाचा प्रतिशोध घेण्याचा निश्चय केला दिनांक 21/12/1909 रोजी जुलमी नाशिक कलेक्टर जॅक्सन यांचा गोळ्या झाडून वध केला संशयाची सुई सावरकरा पर्यंत पोहचली व त्यांना इंग्लंड मधून हिंदुस्तानमध्ये आणण्यात आले. तेव्हाच त्यांची मार्सोलीस बंदरातील उडी जगभरात गाजली जागतिक वर्तमानपत्रानी सुद्धा घटनेला प्रसिद्धी दिली. अखेर त्यांना अटक करून त्यांच्यावर विविध खटले दाखल करून दि.8एप्रिल.1911 रोजी जन्मठेपेची अर्थात काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यांना प्रत्यक्ष यमसदन असलेल्या सेल्युलर जेल अंदमान अर्थात पोर्ट ब्लेयर मध्ये रवानगी करण्यात आली. तेथील तिसऱ्या माळ्यामधील छोट्याशा खोलीमध्ये तेथ त्यांना जवळ जवळ 11 वर्ष नरकयातना देण्यात आल्या. सर्व नरकयातना सहन करून तथा सर्व संकटावर मात करून सावरकर कालजयी सर्व संकटे, वादळे पचवून देशकार्या साठी पुन्हा उभे झाले. सेल्युलर जेल म्हणजे प्रत्यक्ष यमसदनच वीर सावरकर यांना ब्रिटीशांनी ५० वर्षची दोन जन्मठेपेची अर्थात काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावुन त्यांना सेल्युलर जेलमध्ये पाठविण्यात आले होते. सेल्युलर जेल म्हणजे त्याकाळी प्रत्यक्ष यमसदन समजले जाययचे आणि सेल्युलर जेलमध्ये रवानगी म्हणजे प्रत्यक्ष मृत्यू समजले जाययचे सेल्युलर जेल हे अंदमान निकोबर ची राजधानी पोर्ट ब्लेअर शहरात आहे त्याची निर्मिती ब्रिटीशांनी १८९७ साली सुरुवात केली होती आणि १९०६ मध्ये बांधकाम पूर्ण झाले आहे.

त्यामध्ये एकूण जवळपास ६९८ खोल्या असून त्याचे 15X8 क्षेत्रफळ होते. पूर्णता अंधारमय असलेल्या खोली क्र.052 मध्ये सावरकर यांना हातात हाथकडया व पायामध्ये बेडया घालून ठेवण्यात आले होते. तेथे त्यांचा छळ करून मरण यातना देण्यात आल्या आहेत. त्यांना कोल्हूला जुंपवून तीस पाउंड तेल काढण्यापर्यंत कष्ट करून घेतले जात असत. जेवण मात्र निकृष्ट दर्जाचे देण्यात येत होते. अशा भयानक स्थितीमध्येसुद्धा त्यांनी देशाला एका सूत्रात बांधून ठेवणाऱ्या तथा राष्ट्रभक्ती व सामाजिक ऐक्याची भावना साध्या सोप्या भाषेत अमर काव्या ची रचना करून जवळपास सहा हजार कविता शब्दबध्द केलेल्या आहेत पुढे त्यांच्या ह्याच कविता देशातील नाव क्रांतिकारकासाठी प्रेरणच्या शिदोरी ठरल्या आहेत.

अंदमान मधील यातना आणि छळ वीर सावरकर यांना अंदमानच्या काळकोठडीत प्रचंड यातना देण्यात आल्या आणि प्रचंड सुद्धा छळ करण्यात आलेला होता. त्यांना कोल्हूला जुंपल्या जात असे कोल्हू म्हणजे काय १ तर तेलाच्या घाणीला बैल जुंपुन तेल काढण्याच्या प्रक्रियेला कोल्हू म्हणतात. अंदमानच्या काळकोठडीत कोल्हूला बैल जुंपण्या एवजी सावरकरयांना जुंपण्यात येत असे व नारळ तथा सरसोचे तीस पाउंड तेल काढावे लागे त्यामध्ये कुचराई केल्यास वेळेप्रसंगी कोड्याचे फटके सुद्धा मारण्यात येत असत कोडे मारणे म्हणजे चाबकाचे फटकारे असून जे शरीराला लागताच शरीराची अक्षरशा चामडी सोलून काढते कोलूला जुंपणारा छळ व चाबकाचे फटकारे वीर सावरकर यांनी राष्ट्रा साठी सहन केलेली आहेत राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या राष्ट्रवीरांची आज जयंती आहे त्यांना आज वंदन करण्याचा दिवस.

# राज ठाकरेंचा शेतकऱ्यांना सवाल !



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

आधुनिक केसरी

**शेतकरी हा देशाचाचं नाही तर जगाचा पोशिंदा आहे, मात्र मागील काही वर्षात शेतकऱ्याला आर्थिक संकटाना सामोरे जावे लागत आहे. हे थांबलं पाहिजे. यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येणं गरजेचे आहे. तुम्ही मला मतदान करत नाही, मग माझ्याकडे का येता ? असा खडा सवाल राज ठाकरे यांनी शेतकऱ्यांना उपस्थित केला आहे जे तुमची पिळवणूक करतात, त्यांनाच तुम्ही मतदान करता.. याचं भान तुम्ही ठेवायला हवं, असा सल्लाही राज ठाकरे यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नाशिक दौऱ्यावर असताना असा प्रश्न उपस्थित करुन शेतकऱ्यांना सल्ला दिला आहे हे जरी खरे असले तरी राज ठाकरे हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष आहेत सच्चे राजकारणी म्हणून महाराष्ट्रातील तमाम जनता त्यांच्याकडे पाहते एक राजकारणी म्हणून सर्वच क्षेत्रांतील लोक अडचणीच्या वेळी आपल्या समस्यांचे निराकरण व्हावे म्हणून येत असतात मात्र अशा वेळी एक सच्चा राजकारणी म्हणून राज ठाकरे यांनी असा सवाल करणे योग्य वाटत नाही कारण भारतीय लोकशाहीमध्ये मतदान हे गुप्त पद्धतीने केले जाते त्यामूळे मला मतदान करायला नाही असे म्हणणे चुकीचे वाटत असून ठाकरे राजकारणी असल्यामुळे मतदानाकडे न पाहता आपल्या परीने जेवढी शक्य असतील तेवढी जनतेची कामे, समस्या सोडविणे यातच त्यांचे हित आहे.राज ठाकरे म्हणाले की, 'तुम्ही मला मतदान करत नाही, मग माझ्याकडे का येता ? बैठकीला आलेल्या शेतकऱ्यांना प्रश्न केला. ज्यांनी टोलमुक्त महाराष्ट्र करू, असे आश्वासन दिले होते, त्यांनाच तुम्ही मतदान केलं ना ? असे सांगत 'जे तुमची पिळवणूक करता, त्यांनाच तुम्ही मतदान करता..याचं भान तुम्ही ठेवायला हवं..' असे आवाहन देखील राज ठाकरे यांनी नाशिक दौऱ्या दरम्यान केले आहे सव्वा वर्षापासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही पावसाळ्यानंतर होण्याची शक्यता आहे. मुंबई, नाशिक, पुणे या महत्त्वाच्या महापालिकांसह राज्यातील 18 महापालिकांच्या निवडणुका ऑक्टोबरमध्ये होण्याचा अंदाज आहे त्याचं निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे हे नाशिकच्या मैदानात उतरले असताना असा सवाल शेतकऱ्यांना उपस्थित केला आहे त्यामूळे आगामी निवडणुकीत राज्यांतील शेतकरी काय भूमिका घेतात ते पहाणे मोठे औत्सूक्याचे ठरणारं आहे.



# 'पुरुषी' मनात दडलेला 'विषाणू': भय इथले संपत नाही



आशिष निनगुरकर
मो. 9022879904

आधुनिक केसरी

**रस्ते, बस स्थानके, रेल्वे स्थानके, उद्याने आणि अन्य सर्व सार्वजनिक स्थळे सर्वांसाठी खुली आहेत. त्यांचा आनंद सर्वजण घेऊ शकतात. मात्र, अनेक स्त्रियांसाठी ही छळाची ठिकाणे ठरतात. स्त्रियांच्या संचाराच्या तसेच व्यक्ती म्हणून प्रतिष्ठेच्या मूलभूत हक्कावर दररोज गदा आणली जात आहे.सीमा रस्त्यावरून चालत असते, तेव्हा एक पुरुषांचा समूह तिच्या चेहऱ्यावर व बांध्यावर टिप्पणी करतो. 'वा! काय फिगर आहे!' 'बत्तीस असेल की छत्तीस?' सीमा या आगाऊ टिप्पणीकडे दुर्लक्ष करून चालत राहते. टिपण्या अधिक अश्लाघ्य होत जातात. ते तिला 'बिच' म्हणतात.सुधा बससाठी रांगेत उभी आहे. अचानक तिला तिच्या छातीवर हात पडल्यासारखा वाटतो. ती आजूबाजूला बघते पण हे नेमके कोणी केले ते तिला ते कळत नाही. तिला आपल्या खासगी मर्यादेत अतिक्रमण झाल्यासारखे वाटते पण काही बोलण्याची हिंमत तिला होत नाही.**

*(मागील अंकावरून)*

ज्या स्त्रियांनी भारताच्या जाज्वल्य इतिहासात मोलाचं योगदान दिलं, आज त्याच भारतात लिंगनिदान चाचणी होणे आणि त्यावर बंदी घालावी लागणे या अतिशय लांच्छनास्पद गोष्टी घडत आहेत. त्या नवजात अर्भकाचं जगणं हिरावून घेतलं जातं आणि ते का तर ते अर्भक स्त्रीलिंगी आहे म्हणून!

राजमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाईपासून सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर ते कल्पना चावला, इंदिरा गांधी.. अशी किती उदाहरणं द्यावीत नारीशक्तीच्या सामर्थ्याची ? एवढा मोठा इतिहास असूनसुद्धा मुलींना 'चूल आणि मूल' यापुरतेच मर्यादित ठेवले होते. स्वतःला साक्षर, सुशिक्षित म्हणवून घेणारे पालकही या जुनाट मानसिकतेतून बाहेर पडून आपल्या मुलींना स्वातंत्र्य देऊ शकत नाहीत, ही निश्चितच खेदजनक बाब आहे. तिला तिचा स्वाभिमान आणि सन्मान जपण्याचे संस्कार व प्रशिक्षण न देता समाजाच्या भीतीने कोंडून ठेवण्यातच धन्यता मानली जाते. स्त्री हे सर्जनशीलतेचं प्रतीक आहे अशी मान्यता असतानाही तिच्या प्रगतीच्या कक्षा मर्यादित ठेवल्या जातात. आज्जी, आई, मुलगी, बहीण, मैत्रीण, प्रेयसी, पत्नी अशी विविध नाती स्त्री खंबीरपणे निभावताना दिसते पण त्यामागे तिची होणारी घुसमट कायमच लपून राहते. बहुतांशी शहरात आणि प्रामुख्याने खेडेगावांमध्ये अजूनही बालवयातच मुलींचं लग्न लावून दिलं जातं आणि ही कुप्रथा आजही कायम आहे. मात्र या कुप्रथांचा बिमोड करण्यासाठी सरकारने कंबर कसली असून बालविवाहाला कायद्याने अमान्य ठरवले आहे तसेच स्त्रियांच्या सबलीकरणासाठी वेगवेगळे कायदेही बनवण्यात आलेले आहेत. त्यांच्या आरोग्याची, शिक्षणाची व उदरनिर्वाहाची सोय व्हावी यासाठी कित्येक योजना सरकार राबवत आहे. मुलींना स्वतंत्र आणि सुरक्षित वातावरणात वाढण्याचा अधिकार देऊ करणारा महत्त्वाचा कायदा म्हणजे Juvenile Justice Act. या कायद्यानुसार आईवडिलांनी किंवा नातेवाईकांनी मुलींना मारहाण करणे, शिवीगाळ करणे हा गंभीर गुन्हा असून यातील आरोपींना घरगुती हिंसाचाराच्या गुन्ह्यासाठी कठोर शिक्षा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. यासोबतच अल्पवयीन मुलींसाठीही सरकारने अनेक सुधारित कायदे, योजना आणि उपक्रम आणले असून त्यानुसार लैंगिक शोषणासारख्या गैरप्रकारांना आळा बसेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. आपल्या पालकांच्या अथवा नातेवाईकांच्या झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासापोटी अनेक मुलींना प्रचंड वाईट परिणामांना सामोरे जावे लागते. फक्त पैशांच्या लालसेसाठी मुलींना लहान वयातच त्यांच्या मर्जीविरुद्ध वेश्याव्यवसायात ढकलण्याचं दुष्कृत्य हे नराधम करताना दिसतात. ह्या अशा बेकायदेशीर कामांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी Juvenile Justice Act मदत करतोय. या कायद्यामुळे अशा वाट चुकलेल्या मुलींना परत योग्य मार्ग दाखवून जगण्यासाठी उत्साहित केलं जात आहे व 'अपना घर'सारख्या उपक्रमांमधून त्यांच्या सुरक्षेचा आणि सुधारणेचाही प्रबंध केला जात आहे. सरकारने अल्पवयीन मुलींसाठी विशेष योजना राबवून त्यांना आर्थिक मदत व्हावी या हेतूने सुकन्या समृद्धी योजना सुरू केलेली आहे. ही योजना मुलींच्या जन्मापासून सुरु करता येते व ह्या योजनेची पूर्ण माहिती व प्रक्रिया स्थानिक पोस्ट ऑफिसमध्ये मिळण्याची व्यवस्था केली गेली आहे. त्याचसोबत लाडली स्कीम, कन्या कोश, बेटी बचाओ बेटी पढाओ अशा कित्येक योजना सरकारने भविष्यातील स्त्री सबलीकरणाच्या दृष्टीने राबवण्याचे आदेश दिलेले आहेत. मुलीचा जन्म ही जबाबदारी नसून तो एक आनंद आहे. छोट्याशा पावलांनी घरात आलेल्या या लक्ष्मीचं स्वागत करायला हवं. तिचा आदर करणे, तिला सन्मान देणे, तिला निराधार न करता यशस्वी जीवनासाठी प्रोत्साहन देऊन स्त्री सशक्तीकरणासाठी हातभार लावणे हे एक सुजाण नागरिक या नात्याने आद्य कर्तव्य आहे.

# ॥ 'स्वस्ति श्रीवटेशु' ॥



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**पैलमेरुच्या शिखरी एक योगी निराकारी । मुद्रा लावूनी खेचरी प्राणायामी बैसला ।। स्वर्गीचा मरुतगण भुरूपी आला। तापी पूर्णा संगमी प्रगट झाला ।।योगसामर्थ्याने चौदाशे वर्षे जगले अशी मान्यता असलेले नाथ संप्रदायातील श्रेष्ठ हठयोगी, योगीराज चांगदेव महाराज तापी-पयोष्णी तीरावरील चांगदेव गावी प्रथमत: दृष्टीस पडले. हे गाव जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथून अंदाजे १२ कि.मी. अंतरावर असून तिथे आजही चांगदेवाचे पुरातन देऊळ आहे. स्वर्गलोकातील मरूद्गण चांगदेव रूपात पृथ्वीवर अवतरल्याचा उल्लेख काही अध्यात्मिक ग्रंथात आढळतो. चांगदेव महाराजांच्या स्पर्शाने पवित्र झालेल्या या ठिकाणाला पूर्वी चांगावटेश्वर म्हणूनही ओळखल्या जात होते.**

चांगदेव महाराजांनी संस्कृत भाषेमध्ये योगेंद्र चिंतामणी व तत्त्वसार हे दोन, तर मराठीमध्ये उत्तर पंचविशी असे तीन ग्रंथ लिहिले आहेत. चांगदेव स्वर्गलोकातून भूमीवर आले असल्याने त्यांनी चौदा विद्यांवर लिलया प्रभुत्व मिळविले होते. इतकेच नव्हे तर जो ग्रंथ ते हाती घेत असत, तो ग्रंथ ते मुखोद्गत करत असत. महिपतीबोवांनी चांगदेव महाराजांनी आत्मसात केलेल्या चौदा विद्या पुढीलप्रमाणे सांगितल्या असून त्यातील प्रथम विद्या सुभाष्ययुक्त यात चांगदेवांनी श्रुती, वेद मुखोद्गत केले. दुसरी सारविद्या याअंतर्गत न्याय, व्याकरण इ. सहा शास्त्रांचा त्यांनी अभ्यास केला. यानंतर चांगदेवांनी गणकविद्येमध्ये ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला. चौथी व पाचवी विद्या रसक्रिया व नाडीज्ञान यामध्ये रोग निदान, चिकित्सा आणि रोगावरील योग्य औषध देणे ते शिकले. सहा व सात धनुर्विद्या व अस्त्रशस्त्रास्त्रे. आठवे कामशास्त्र, संगीत- नृत्य कला ह्या नववी व दहावी विद्या. अकरावी हेमविद्या या अंतर्गत ते पाण्यावर चालायला शिकले, तर बारावी विद्या होती परकाया प्रवेश. तेरावी वस्तूमात्रांची परिक्षा, मनीची खूण ओळखणे आणि चौदावी योगविद्या. अशा प्रकारे चौदा विद्या आणि चौसष्ट कला त्यांनी आत्मसात केल्या. लोक चांगदेवांना सिद्ध पुरूष मानू लागले होते तर कोणी त्यांना शिवाचा अवतार म्हणत. दुःखी-कष्टी लोक आपल्या कामना पूर्ण करण्यासाठी चांगावटेश्वराच्या दर्शनाला येऊ लागले. रोगी बरा होणे, आंधळ्याला दिसू लागणे, बहिऱ्यास ऐकू येणे असे चमत्कार तिथे होऊ लागल्याने, चांगदेवांची भक्तमंडळी वाढू लागली. दर वर्षी चांगावटेश्वरला यात्रा भरू लागली. वाढत्या शिष्य संख्येने चांगदेवांचा अहंकारमात्र जन्मास आला. चांगदेवांनी मृत्यूलाही जिंकले होते. इच्छेस येईल तेथे ते क्षणार्धात जात असत त्यांनी गुरु केला नव्हता पण विद्या व सिद्धी दाखवून अनेक शिष्य केले. जेव्हा चांगदेवांना ज्ञानेश्वर माऊलींचा रेड्याकडून वेद बोलवून घेण्याचा चमत्काराबद्दल चांगदेवांना माहिती मिळाली, तसेच स्वर्गातून पितर बोलावून भोजन देवून परत स्वर्गात पाठविल्याचे समजल्यावर चांगदेव अचंबित झाले. तेव्हा त्यांना ज्ञानदेवादी भावंडांच्या भेटीची उत्कंठा लागली. भेटण्यापूर्वी पत्र पाठवावे असा विचार करुन त्यांनी पत्र लिहिण्यास घेतले पण मायना काय लिहावा या संभ्रमातून त्यांनी कोरेच पत्र पाठविले आणि त्याचे उत्तर मागविले. कोरे पत्र पाहून ज्ञानेश्वर, सोपान ह्यांनी मुक्ताईकडे पत्र दिले. मुक्ताई म्हणाल्याः

"दादा चौदा विद्या, चौसष्ट कला, ४ वेद व ६ वेदांग, सर्व प्रकारच्या विद्या व अष्टांग योगसमाधी शिकूनही चांगदेव कोरेच राहिले आहेत असा ह्या पत्राचा अर्थ होतो." **नाही सुखदुःख पापपुण्य नाही ।नाही धर्मकर्मकल्पना नाही । नाही मोक्ष ना बंधन नाही ।म्हणे वटेश्वरा ब्रह्मा पाही । सहजसिध्द बोले मुक्ताबाई ।।**

निवृत्तीनाथांनीसुद्धा ओळखले की चांगदेव हे योगी असूनही आत्मज्ञानाची कमतरता आहे. म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरांना उत्तर लिहिण्यास सांगितले. त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी उत्तरादाखल ६५ ओव्यांचे पत्र लिहिले चांगदेवांच्या उद्धारासाठी लिहलेल्या या पत्रामधून ज्ञानदेवांनी वेदांचे सखोल ज्ञान व गुरुतत्व चांगदेवांसमोर उलगडले आहे. याच पत्राला "चांगदेव पासष्टी" म्हणून ओळखले जाते.


**चांगदेवा तुझेनी व्याजे ।माउलीया निवृत्तीराजे ।**
**स्वानुभव रसाळ खाजे ।दिधले लोभा ।।**

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, हे चांगदेवा, तुझं निमित्त करून सद्गुरु निवृत्तीराज माउलींनी स्वानुभवरुपी रसाळ खाऊ असलेली ही पाषष्टी तुझ्या प्रेमाखातर माझ्याकरवी लिहून पाठविला आहे.

**स्वस्ति श्रीवटेशु ।जो लपोनि जगदाभासु ।दावी मग ग्रासु ।प्रगटला करी प्रगटे तंव तंव न दिसे । लपे तंव तंव अभासे ।प्रगट ना लपला असे ।न खोमता जे ।।**

या आत्मनात्मक विचारापासून प्रारंभ करून दृष्टांच्या दृष्टांतांच्या साहाय्याने द्वैत खोडीत स्फूर्तीवाद पुकारत अवघ्या ६५ ओव्यांमध्ये अत्युच्च असा अध्यात्म विचार मांडत आपल्या अमृतानुभावाचे सार ज्ञानेशांनी लिहिले आहे. हा जरी छोटासा ग्रंथ असला तरी चिमुकल्या हिरकणीप्रमाणे तेजाची किरणे वाचकांच्या हृदयाकाशावर टाकणारा आहे. ज्ञाता, ज्ञान व ध्येय ही त्रिपुटी ज्ञानाचाच प्रकाश होय हा सिद्धांत ज्ञानेशांनी अनेक सुंदर दृष्टांत देऊन या पाषष्ठीत कथन केला आहे. ज्ञानदेवांच्या या पासष्ट ओव्यांच्या पत्राचा अर्थ चांगदेवांना काही उलगडला नाही म्हणून त्यांनी ज्ञानदेवांची भेट घेण्याचे ठरवले. त्यांनी मोहन वशीकरण विद्येचे स्मरण करून वाघाला वाहन आणि सर्पांचे चाबूक म्हणून आवाहन केले व ते व्याघ्रावर आरूढ होऊन घोडे, रथ असा ताफा घेवून भल्यामोठ्या शिष्यपरिवारासह ज्ञानदेवांच्या भेटीला जायला निघाले. चांगदेव मधोमध आणि आजुबाजुला त्यांचा शिष्य समुदाय असे सर्व येताना पाहून लोक आश्चर्यचकित होऊन कौतुक करू लागले. चांगदेवांची स्वारी जसजशी पुढे जात होती तसे मार्गातील गावा गावांमध्ये चांगदेवांचे स्वागत होऊ लागले. लोक पुजेचे तबकासह त्यांच्या दर्शनाला येऊन आपापल्या मनोकामना चांगदेवांपुढे व्यक्त करू लागले आणि चांगदेवांच्या कृपेने त्या पूर्ण होऊ लागल्या. चांगदेव महाराज आळंदीला पोहचले तेव्हा निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताई हे चौघे एका भिंतीवर बसले होते. निवृत्तीनाथ ज्ञानदेवांना म्हणाले, "ज्ञाना, संत मंडळी आपल्या भेटीला घरी आली आहेत त्यांचे स्वागत करण्यासाठी आपणही त्यांना सामोरे गेले पाहिजे. ज्ञानदेवांनी निवृत्तीनाथांना नमस्कार केला आणि ते चौघे ज्या भिंतीवर बसले होते त्या भिंतीला उद्देशून ते म्हणाले,"चल, चांगयाच्या समोर वेगाने जाऊया, चल. हे शब्द ज्ञानदेवांच्या मुखातून बाहेर पडताच अघटितच घडले. **एकनाथ महाराज याबाबत म्हणतात चालविली जड भिंती ।हरली चांगयाची भ्रांती । मोक्ष मार्गीचा सांगती ।ज्ञानोबा माझा ।।**

चौघे भावंडे ज्या भिंतीवर बसली होती, ती एकाएकी हलू लागली आणि एकदम अश्वगतीने ती भिंत आकाशमार्गे धावू लागली. लोक हा चमत्कार पाहून आश्चर्यचकित झाले. गावातील सर्व लोक हातातील कामे टाकून भिंतीच्या मागे मागे धावू लागले. ती भिंत अलगदपणे चांगदेवांसमोर जाऊन थांबली. ज्ञानेश्वरांच्या आज्ञेप्रमाणे भिंत चालण्याचा चमत्कार पाहून चांगदेव हतगर्व झाले. त्यांना स्वसिद्धिंबद्दल झालेला अहंकार झर्रकन खाली उतरला. ज्ञानदेवांचे सामर्थ्य त्यांना समजले होते. ते मनात म्हणाले, "मी सजीव वाघांना व सर्पांना वश करून माझे वाहन बनवले पण ज्ञानदेवांनी तर दगडविटांनी बनलेल्या निर्जीव अशा भिंतीतच चेतना निर्माण केली आणि भिंतीवर स्वार होऊन माझ्या स्वागतासाठी आले आहेत, हे सारे नवलच आहे." असा विचार करून पटकन वाघावरून खाली उतरून ज्ञानेश्वरांना शरण



जात त्यांच्यासमोर चक्क चांगदेवांनी लोटांगणच घातले. मग निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताई सुद्धा भिंतीवरून खाली उतरले आणि चांगदेवांच्या पाया पडू लागले पण चांगदेवांनी त्यांना प्रेमाने उठवलं आणि आलिंगन दिले. ज्ञानेश्वर माऊलींनी चांगदेवाकडे कृपादृष्टीने पाहिल्याबरोबर चांगदेवाच्या जन्माचे सार्थक झाले. चांगदेव महाराजांनी त्यांच्या चवदा विद्या, चौसष्ट कला, षडांगासहित योगाभ्यास, हठयोग, जारण - मारण - उच्चाटन ह्या सर्व कला विद्या आपल्या व्याघ्रसहवासासहित त्यांना अर्पण केल्या. साष्टांग लोटांगण घालून शरण गेल्यावर चवदा वर्षाच्या योगमाया मुक्ताबाईंनी चवदाशे वर्षाच्या योग्यास उपदेश दिला. ज्ञानदेव - चांगदेव भेटीची साक्ष असलेला विश्रांतीवड नावाचा परिसर आळंदीला स्मृतीस्थळ म्हणून आजही आहे. या ऐतिहासिक स्थानाला पवित्र ठिकाण मानले जाते. श्रीज्ञानेश्वर महाराज व त्यांची भावंडे ज्या भिंतीवर बसून चांगदेवांना सामोरे गेले ती भिंत अजूनही आळंदीत आहे. निवृत्तिनाथांच्या आज्ञेवरून मुक्ताईने चांगदेवास आत्मबोध केल्यावर चौघाही भावंडांना ते पुन्हा पुन्हा, भावनावेगाने, पश्चातापाने नमस्कार करू लागले.

**चांगदेव म्हणे आजी जन्मा आलो ।**
**गुरुपुत्र झालो मुक्ताईचा ।।**

या प्रसंगानंतर त्यांचे ज्ञानी भक्तात रूपांतर झाले. आत्मज्ञानापुढे मृत्यूला परतवून लावणाऱ्या सिद्धीचीही किंमत शून्य आहे हे चांगदेवांना उमगले. मुक्ताईने चांगदेवांना एक अभंग ऐकवला.

**मी कोण हे वोळखावे ।आपण आपणा पहावे । स्वरूपी समरसावे रात्रंदिवस ।त्रिगुणावरूते ज्ञान पै निश्चित ।तथा पै निरुते घेई बापा ।मुक्ताई म्हणे होई तू सावध ।सांगितल्या बोध पुढील तो ।।** मुक्ताई चांगदेवांना म्हणाली, "सावध राहून सत्व, रज, तम या ती गुणांवर मात कर आणि स्वस्वरूपाला ओळख." मुक्ताई चांगदेवांची गुरु बनली, तिने त्यांना अनुग्रह दिला. सद्गुरू कृपेशिवाय आत्मज्ञान होत नाही या श्रुतीवाक्याप्रमाणे मुक्ताईकडून बोध झाल्यावर चांगदेवांचा अहंकार गळून पडला. त्यांना अवघे चराचर त्यांना पांडुरंगमय दिसू लागले.

ज्ञानदेवांच्या संगतीत महिनाभर रोज ज्ञानदेवांचे किर्तन श्रवण करून त्याचे मनन, चिंतन करत त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. ज्ञानदेवांनी त्यांना विचारले, "आता येथे राहून तुम्हाला एक महिना होत आला आहे. आता तरी पत्राचा अर्थ तुम्हाला समजला का, ते मजसी सांगावे." तेव्हा हा चांगदेवांनी ज्ञानदेवांच्या चरणावर लोटांगण घालत त्यांना एक अभंग ऐकवला.

**वळेना वरसेवर पूर आला ।तेथे जन बुडाला बाईयांनो ।बुडाला बुडाला परी म्हणती ।बुडाल्याची शुद्धी कोणी न घेती ।बुडाला पैल बुडाला ।कोरड्याच डोही जन बुडाला । ज्ञानदेव सांगडी मुक्तााई तारू । चांगा पैल पारू पावविला ।।**

चांगदेव म्हणाले, "मी अज्ञानरूपी अंधकाराच्या डोहात बुडालो होतो. तेव्हा ज्ञानदेव व मुक्ताई या दोघांनी मला पैल तीरावर नेऊन ज्ञानी करून सोडले."

चांगदेवांचा अभंग ऐकून ज्ञानदेवांना संतोष वाटला. चांगदेवांनी सद्गुरू पुजनाची इच्छा प्रकट केली. यथाविधी वेदोक्त मंत्रासहित ज्ञानेश्वरादी भावंडांची पूजा करून साश्रू नयनाने चौघांचा निरोप घेतला. चांगदेवांच्या मुक्ताईबाबत खालील ओळी प्रसिद्ध आहेत... **धन्य धन्य मुक्ताबाई ।तुमचे पायी माझे डोयी ।। माझा केला अंगीकार ।दाखविला परात्पर ।। तेथे नांदे सोमेश्वर ।तापी पुर्णा बरोबर ।। चांगा आला लोटांगणी ।लोळे मुक्ताई चरणी ।।** चांगदेवांचे अभंग पाहता त्यांचा ओढा रूपके योजून चमत्कृती निर्माण करण्यातकडे आहे, असे दिसते. शब्दकुसरीतही ते तरबेज आहेत.

**नोवरी चे पोटी नोवरा जन्मला ।सोहळा जाहला काय सांगो ।नोवऱ्याने नोवरी देखिलीच नाही ।सोहळा होतो सांगो काई ।**

अशी अनेक चमत्कृतीपूर्ण कुटे चांगदेवांनी रचली आहेत. याशिवाय त्यांच्या तत्त्वसार नावाच्या ग्रंथात त्यांनी पद, पिंड, रूप व रूपातील त्यांच्याविषयी विवरण करून नंतर निर्गुण भक्तीचे विवरण केले आहे. निर्गुण भक्तीचे लक्षण सांगताना चांगदेव म्हणतात- **जे पाप पुण्यपूर्वी ।जन्ममरणाते हारवी ।महाबोधु चेववी ।आत्मस्वरूपे ।।**

**जे दुसरेपणा हाणी ।स्वर्ग संसारा धुणी ।**
**जे सविता निर्वाणी ।स्वयं शिव ।।**

निर्गुण भक्तीचे स्वरूप सांगताना मनपवन, षटचक्रे, कुंडलिनी, लयलक्षयोग, समाधी, पंचभूते, शून्य, वज्रासन, इत्यादी हठयोग साधनांची माहिती त्यांनी दिली आहे. या विवचनेतला विशेष म्हणजे पुढील विचार होय - **जऱ्हीं शरीरसाधना कीजैल । परि नाशिवंत जाईल ।वरी जन्मातें सुचिल ।दुःख मूळ ।।** पुढे निर्वाण सिद्धयोग यांचे प्रतिपादन करून ब्रह्मविवरण केले आहे. चांगा, वटेश्वर, चक्रपाणी या अन्य नावांनीसुद्धा महायोगी चांगदेव ओळखले जातात. चांगदेव महाराज मृत्यूची वेळ जवळ आली की, ते प्राण आत्मस्थानी व आत्मा ब्रह्मांडी ठेवत, वेळ टळून गेली की, ते पुनरुपी देहात येत. याप्रमाणे त्यांना चौदाशे वर्षाचे आयुष्य मिळाले असे सांगितले जाते. मुक्ताबाईंना दिलेल्या शब्दाप्रमाणे चमत्कृतीपूर्ण चरित्र असलेले योगीराज चांगदेव गोदावरी नदीच्या तीरावर श्रीक्षेत्र पुणतांबा, जि.अहमदनगर येथे समाधिस्त झाले. ब्रह्मचित्कला मुक्ताईच्या या महायोगी शिष्यास शत शत प्रणाम.

# रासबिहारी बोस: अनेक भाषांवर प्रभुत्व!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**रासबिहारी बोस हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक क्रांतिकारक नेते होते. गदर मुक्ती आणि नंतर भारतीय राष्ट्रीय सेना या संस्थांचे ते मुख्य संयोजक होते. रासबिहारींना सुरुवातीपासूनच क्रांतिकारी कृतीत रस होता. सुरुवातीची काही वर्षे रासबिहारी पश्चिम बंगालच्या हुगळी जिल्ह्यात राहिले. त्यांनी सन १९०८मध्ये अलिपोर बॉम्बचा खटला चालविण्यासाठी बंगाल सोडले. डेहराडून येथे त्यांनी वन संशोधन संस्थेमध्ये प्रमुख कारकून म्हणून काम केले. तेथे युगंतरच्या अमरेन्द्र चटर्जीद्वारे ते गुप्तपणे बंगालच्या क्रांतिकारकांसोबत सहभागी झाले.**

त्यांची ओळख युनायटेड प्रॉव्हिन्सेस- सध्याचे उत्तर प्रदेश आणि पंजाबमधील आर्य समाजातील अनेक प्रमुख क्रांतिकारी सदस्यांशी झाली. रासबिहारींच्या नेतृत्वाखाली दि.२२ डिसेंबर १९१२ रोजी लॉर्ड हार्डिंग हे किंग जॉर्ज पाचव्याच्या दिल्ली दरबारमधून परत येत असताना त्यांच्या खुनाचा प्रयत्न करण्यात आला. अमरेंद्र चॅटर्जींचे शिष्य बसंतकुमार विश्वास यांनी मणिंद्रनाथ नायक यांनी बनवलेला बॉम्ब हार्डिंगच्या हौदात फेकला. पण या हल्ल्यात हार्डिंग बचावले. हा कट फसला व त्यानंतर राशबिहारींना अज्ञातवासात जावे लागले. जवळपास ३ वर्षे रासबिहारींनी ब्रिटिश सरकारला यशस्वीपणे हुलकावणी दिली. या दरम्यान ते गदर कटात सामील झाले. तद्नंतर ब्रिटिशांनी त्यांचा कसून शोध सुरू केला. पुढील कार्यासाठी त्यांनी जपानला पलायन केले होते. रासबिहारी बोस हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक क्रांतिकारक देशभक्त होते. त्यांचा त्यांना दि.२५ मे १८८६ रोजी सुबलदाह, बर्धमान जिल्हा, बंगाल प्रेसिडेंसी येथे झाला. विद्यार्थी दशेतच चंद्रनगरच्या तरुण क्रांतिकारी गटात हे सहभागी झाले. श्रीष घोष व अमरेंद्र चटर्जी यांनी त्याला क्रांतिदीक्षा दिली होती. मुलगा शिकत नाही म्हणून वडिलांनी त्याला पुढे सिमल्याला आणले. घरीच इंग्रजी व टंकलेखन शिकविले. दोन्हीत चांगली प्रगती झाल्यावर आपल्याच छापखान्यात चिकटवून दिले. स्वतंत्र वृत्ती व क्रांतीकडे ओढा असल्यामुळे घर सोडून दूर डेहराडूनला जंगल खात्यात रासबिहारींनी नोकरी धरली. सन १९०८पासून १९१३पर्यंत वारंवार रजा घेत असूनसुद्धा कशीबशी नोकरी टिकली. त्या वेळी बंगालच्या अनेक शहरांतून त्याचप्रमाणे बनारस, दिल्ली, लाहोर इ. शहरांतून क्रांतिगट कार्यरत होते. प्रत्येक गटात एक तरी बंगाली असायचाच. त्यामुळे रासबिहारींना या सर्वांशी संबंध ठेवणे सुलभ गेले. सन १९१२च्या मध्यास त्यांनी बंगाल-चंद्रनगरला जाऊन बाँब व बाँब साहित्य आणि अनेक तरुण क्रांतिकारक जमविले. बसंतकुमारला आपल्या घरी बरेच महिने ठेवून पूर्ण संधी दिली. बंगाली व पंजाबी क्रांतिकारी नेत्यांच्या सल्ल्याने व्हाइसरॉयवर बाँब टाकण्याची योजना आखली. बंसतकुमार तयार झाल्यावर त्यास लाहोरला धाडले. २३ डिसेंबरला लॉर्ड चार्ल्स हार्डिंग मोठ्या मिरवणुकीने दिल्ली येथे प्रवेश करून तेथे भारताची राजधानी सुरू करणार होते. आदल्या दिवशी रासबिहारी डेहराडूनहून व बसंतकुमार लाहोरहून दिल्लीला आले. एका क्रांतिकारक मित्राकडे दोघेही उतरले. दुसऱ्या दिवशी हत्तीच्या अंबारीत दिमाखाने बसलेल्या व्हाइसरॉयसाहेबांवर बसंतने बाँब फेकला. हार्डिंगना गंभीर इजा झाली. पुढे रासबिहारींनी पुरविलेल्या बाँबच्या साहाय्याने व बसंतकुमारच्या मदतीने लाहोर गटाने खळबळ उडवली. पण पुढे दिल्ली कटाच्या खटल्यात बसंतकुमारसह चौघांना फाशी देण्यात आली. गदर चळवळ सन १९१४च्या महायुद्धानंतर सुरू झाली. गदर क्रांतिकारकांच्या हालचाली सॅन फ्रॅन्सिस्कोपासून पंजाबपर्यंत पसरल्या होत्या. विष्णुपंत पिंगळे बनारस गटाचे साह्य घेण्यासाठी रासबिहारींना बनारसलाच भेटले. ज्या पंजाबमध्ये मुख्य उठाव योजिला होता, तेथेच समर्थ नेतृत्वाची उणीव होती. पिंगळ्यांच्या विनंतीवरून रासबिहारींनी पंजाबच्या गदर उठावाची योजना तयार करण्याचे मान्य केले. अनेक भाषांवर प्रभुत्व, गुप्ततेच्या नियमांचे काटेकोर पालन, चाणाक्षपणा, हजरबाबीपणा आणि बेमालूम वेषांतरे करण्याची हातोटी असल्यामुळे ते पुढे काही महिने पंजाब, बनारस, चंद्रनगर येथे राहू शकले. शेवटी जून १९१५मध्ये ते जपानला पवननाथ टागोरांच्या पारपत्राच्या मदतीने निसटले. तेथेही युद्ध संपेपर्यंत त्यांनी क्रांतिकार्य चालू ठेवले होते. जपानी सरकारने त्यांना पकडण्याचे व ब्रिटिशांच्या हवाली करण्याचे हुकूम काढले. तेव्हा ते तेथेही अज्ञातवासात गेले. पुढे जपानी युवतीशी विवाह केल्यामुळे काही वर्षांनी म्हणजे सन १९२३ साली त्यांना जपानी नागरिकत्व मिळाले. पुढील १८-१९ वर्षे त्यांनी लेखन-भाषणाद्वारे हिंदी स्वांतत्र्याच्या प्रश्नावर जपानी जनतेमध्ये जाणीव निर्माण करण्याचा अखंड प्रयत्न केला. रासबिहारींचा तरुण मुलगा महासिदे जपानी फौजेत होता. त्याला ब्रिटिश सेनेशी झालेल्या लढाईत वीरमरण आले. रासबिहारी बोस यांचा मृत्यू टोकियो, जपान येथे दि.२१ जानेवारी १९४५ रोजी झाला.

# संविधान एका जातीची संपत्ती नाही

विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आज भारतीय संविधान म्हटले की एका विशिष्ट जातीकडे बघीतले जाते. संविधान एकाच जातीची खाजगी संपत्ती आहे की काय असेच वाटते. जातीयतेची घाण डोक्यात ठेवून समतेच्या गोष्टी सांगणारा हा भारतीय समाज आहे. भारतीय संविधान लागू होऊन ७० वर्षे पुर्ण होत असताना अजुनही आम्हाला संविधान समजले नाही. कोणी कोणी संविधानाला मोठ्या प्रमाणावर डोक्यावर घेते व कोणी कोणी संविधानाचे नाव जरी घेतले तरी चेहऱ्यावरचे हावभाव बदलाणारे देशभक्त याच देशात आहेत. देशभक्तीचा आव अंगात आणणाऱ्या लोकांनी संविधान कधी वाचले असेल का? संविधानाचा अर्थ समजून घेतला असेल का? संविधान राष्ट्रीय ग्रंथ आहे हे किती लोकांना पचणारे आहे.**

हे तर संशोधनाचा विषय होऊन बसला आहे. संविधान विरोधी एखादी गोष्ट घडत असेल तर विशिष्ट जातीचेच लोक निषेध करतात. फक्त भारत माता कि जय म्हणून राष्ट्रप्रेम दाखवता येत नाही. त्यासाठी देशाचा कायदा, ध्वज व प्रतिकांचा सन्मान करावा लागतो. आम्ही राष्टध्वजापेक्षा रंगाच्याच ध्वजाला जास्त महत्त्व देऊन धार्मिक कट्टरता दाखवतो. जो धार्मिक कट्टरता दाखवतो तो देशभक्त होऊच शकत नाही कारण संविधान आम्हाला धर्मनिरपेक्षता शिकवते. वेगवेगळ्या रंगाचे झेंडे हातात घेऊन धार्मिक दहशत निर्माण केल्या पेक्षा राष्ट्रध्वज हातात घेऊन एकतेची व समानतेची शिकवण देणारा प्रभावी गट येथे दिसत नाही समता व एकता हे संविधानाला अपेक्षित आहे. आजपर्यंत काही लोकांनी संविधानाचे पुस्तक देखील पाहिले नाही ते लोक सांगतात संविधानाने आम्हाला काहीच दिले नाही. हे मानसिक गुलामीचे ज्वलंत उदाहरण आहे. मनुस्मृती वर विश्वास असणारी मनुची पिलावळ संविधानाचा अपप्रचार करतात पण ज्या बहुजन समाजाला संविधानाने राजा बनण्याचा व एकंदरीत आदर्श जिवन जगण्याचा अधिकार बहाल केला ते संविधान न वाचता मनुस्मृती वर विश्वास असणाऱ्या लोकांच ऐकतात. परिणाम तो भारतीय संविधान समजून घेत नाही म्हणून संविधानाने दिलेल्या सुख सुविधेची त्याला जाणीवच होत नाही. आणि बहुतांश लोक संविधानाला हात लावत नाहीत ते वाचत नाहीत याचे कारण आहे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहले म्हणून. आम्ही जातीव्यवस्था मानत नाही. बाबासाहेब आंबेडकर यांना मानतो म्हणणारे लोक संविधानाचा अभ्यास करत नाहीत, संविधान समजून घेत नाहीत एवढेच काय संविधान विरोधी एखादी गोष्ट घडली तर साधा निषेधही करत नाहीत या वरुन यांचा खोटेपणा उघड होतो. जातीयतेने माखलेल्या मेंदुमध्ये विषमता वादी व्यवस्थेचे बिजारोपण करणारे लोक देशाप्रती प्रेम व्यक्त करत असतील तर ते खऱ्या अर्थाने देशद्रोही आहेत. भारतीय संविधान कोणासाठी आहे याचा विचार, अभ्यास न करता ते कोणी लिहले यावरून संविधानाचे महत्त्व ठरवले जाते. एवढे आम्ही जातिवंत विद्वान आहेत. भारतीय संविधानाने sc, st, obc,



यांना आरक्षण देऊन यांचे प्रतिनिधी तयार केले म्हणून आज कुठे या प्रवर्गातील लोक समोर आलेले दिसत आहेत. अनेक धर्म व हजारो जातींना एकत्र नांदविण्याचे त्यांच्या विकासाचे सर्व उपाय संविधानाने दिलेले आहेत. लोकांनी संविधान कधी वाचले नाही म्हणून लोकांना ते समजले नाही. लोकांना समजले नाही म्हणून अमंलबजावणी करणाऱ्या लोकांनी त्याची अमंलबजावणी केली नाही. उलट स्वतः चे घर भरून संविधान विरोधी काम करून संविधानाची प्रतीमा मलीन करण्याचा प्रयत्न केला गेला. प्रसार माध्यमांद्वारे संविधानाची जनजागृती होणे आवश्यक असताना प्रसारमाध्यमे च संविधान विरोधी असल्याने संविधाना विषयी प्रबोधन करण्याऐवजी जातीय दंगली निर्माण होतील अशाच बातम्या देण्याचा त्यांचा मानस असतो. आज पर्यंत कोणत्याही प्रसारमाध्यमे भारतीय संविधान राष्ट्रीय ग्रंथ आहे त्याचा सन्मान करून तो अभ्यासला गेला पाहिजे असे सांगितले नाही उलट कोणी जर संविधान जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतला असेल तर अमुक समाजाच्या लोकांनी संविधान दिवस साजरा केला अशा प्रकारचे दाखवून संविधान एकाच जातीचे आहे असे दाखवण्याचा प्रयत्न केला. संविधानावर कधीही सकारात्मक चर्चा प्रसार माध्यमातून घडवून आणली नाही. वंदे मातरम्, भारतमाता की जय वरुन राष्ट्रप्रेम सिध्द करण्यासाठी जिवाचा आटापिटा करणारा मिडिया संविधानावर एकही शब्द बोलत नाही म्हणजे मिडीयाचं कीती प्रेम असेल देशावर! प्रत्येक घटकाडुन संविधान एकाच जातीच्या फायद्याचे आहे असेच विधाने साधारणपणे केली जातात. बाबासाहेब आंबेडकर व संविधान यांचा स्विकार न करण्यामागे जातीयता हाच सर्वात मोठा मुद्दा आहे. संविधान थोडे वाचले जरी असते तर देशाच्या विकासाला थोडा फार प्रत्येकाचा हातभार लागला असता. एका जातीने थोडेफार संविधान वाचले थोडे फार समजले. मग ही जात संविधानाची जनजागृती करण्यासाठी रस्त्यावर उतरली, स्टेजवरुन जोरजोरात ओरडून सांगु लागली संविधान आमच्याच बापाने आमच्याच साठी लिहले. असे बोलल्यामुळे ज्यांनी कधी संविधानाचे नावच ऐकले नाही त्या लोकांना वाटले मानुस स्टेजवरून सांगतो संविधान आमच्याच साठी बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले तर तो खोटा थोडी बोलणार खरच यांच्या च साठी लिहले असेल. अशी लोकांची मानसिकता होत असते. आमचे बंगले, आमच्या गाड्या व आमचा सन्मान बाबासाहेब आंबेडकर अर्थात संविधानाने वाढविला असे ओरडणारा sc, st, obc चा मान सन्मान, गाडी बंगले हे संविधानामुळेच आहेत हे सांगण्यास तो विसरून गेला. याचा परिणाम आज भारतीय संविधान म्हटले की फक्त एकाच जातीसाठी आहे अशी मानसिकता शिकलेल्या व स्वतः ला विद्वान समजणाऱ्या बहुतांश लोकांची आहे. संविधान हे जातीसाठी नसुन देशासाठी आहे देशाच्या कारभारासाठी हे प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे. संविधान आमच्याच बापानी आमच्या साठी लिहले असे बोंबलणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे बाबासाहेब आंबेडकर यांनी संविदानाचा सातबारा तुमच्या नावावर करून दिला नाही. फालतुगिरी करून चुकीचे संविधान सांगु नका. भारतीय संविधानाचा सातबारा भारत देशाच्या नावाने आहे. संविधानाची सुरवात आम्ही भारताचे लोक या वाक्यापासुन होते. म्हणून प्रत्येक भारतीयांच कर्तव्य आहे संविधान समजून घेतले पाहिजे व त्या प्रमाणे लागले पाहिजे. संविधानामुळे प्रत्येकाला शान आहे.

# जीवन चिंतनाचे दर्शन घडविणाऱ्या चारोळया- वाटले मला जे..

आधुनिक केसरी

**साहित्याचा आस्वाद घेताना साहित्य वाचकांचे मनोरंजन करत असत. त्याचवेळी जगण्यासाठी प्रेरणा आणि शक्ती देखील देत असते.अशी शक्ती व प्रेरणा देते ते खरे साहित्य. खरेतर प्रत्येकाचे आयुष्य म्हणजे एक पुस्तकच असते.त्या पुस्तकाच्या पानापानावर अनुभवाची मांडणी केलेली असते.त्या अनुभवातून इतरांना काही सांगायचे असते. ते सांगणे कोणी कथेतून,कवितेतून,नाटक, कांदबरीतून करत असते.साहित्यातील विविध प्रकारचा विचार केला असता अत्यंत कमी शब्दात आपले भाव व्यक्त करण्याचे काम कवितेतून होत असते.आज कवितेच्यापेक्षाही कमी शब्दात व्यक्त होण्याचा आणि विचार प्रतिपादन करण्याचा प्रयत्न होतो आहे.**

त्यासाठी चारोळ्या हा साहित्य प्रकार चांगला रूढ होऊ पाहतो आहे. तो प्रकार आजच्या तरूणाईत अधिकाधिक लोकप्रिय होतो आहे हे कसे नाकारणार ? तशी ही वाट साधी सोपी नाही. अवघ्या चार ओळीत बरेच काही सांगून जात वाचकांना आत्मभान देणे असेल किंवा विचार करण्यास प्रेरित करणे असेल हे काम कठीणच म्हणायला हवे. हे काम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या माजी अध्यक्ष ड़ॉ.शकुंतला काळे-गावडे यांनी अत्यंत सहजतेने 'वाटते मला जे' या चारोळी संग्रहात केले आहे. जीवनभर एका वाटेने प्रवास करताना जे अनुभवास आले ते टिपत स्वतःच्या मूल्यांशी तडजोड न करता, पुढच्या पिढीसाठी बरेच काही देण्याचा प्रयत्न या संग्रहात केला आहे. संग्रह म्हणजे आनंद, तत्वज्ञान आणि जीवनाचे दिशादर्शन आहे. त्यामुळे वाचून पटकन संपणारा असला तरी आचरणासाठीची वाट मात्र कठीण आहे. त्यामुळे वाचकांच्या हदयाचा ठाव घेणाऱ्या ओळी बरेच काही सांगून जातात.
जीवनाचा प्रवास यशस्वी करायचे असेल तर विचारसूत्राने प्रवास करावा लागतो. त्यात सतत प्रामाणिक असणे आणि आत्मपरिक्षण करण्याची गरज असते.स्वतःचा शोध घेताना स्वतःशीच प्रामाणिक राहिले तर यश मिळत जाते.आपल्या जीवनाचा प्रवास हा असाच आहे...आणि जे काही लिहिले आहे ते सुध्दा काही न राखता रेखाटण्याचे काम केले आहे. माणसं स्वतःशी प्रामाणिक असेल तरच शब्दात ते उतरतात. त्यामुळे कवयत्रीच्या भावना व्यक्त करताना त्या लिहितात.. शोधताना स्वतःला मी स्वतःशी प्रामाणिक राहिले भावना शब्दात रेखताना हातचे काही न राखिले माणसं वर्तमानात फारच गर्दीत असतात. आपल्याभोवती पाहवे तिकडे माणसं आणि माणसं असतात. पण भोवती माणसं असली म्हणजे ती सोबत असतातच असे
नाही. अनेकदा अशावेळी या गर्दीत आपण एकटेच असतो. गर्दीत माणसांचा शोध सुरू असतो..पण अलिकडे गर्दीत माणूस सापडणे कठीण होत चालले आहे.अशावेळी त्या गर्दीत आपले म्हणून कोणी सापडत नाही. आपले नात्याची वीणही सैल झाली आहेत. त्यामुळे हाती फार काही उरलेले दिसत नाही. हाती काय तर शुन्य असते हा अनुभव सर्वांच्याच वाट्याला येतो. तो अनुभव शब्दात सांगत त्या लिहितात..

**गर्दीत माणसांच्या मी एकटीच असते**
**असून भोवती सारे आपले कुणीच नसते**
**नात्याची सुध्दा बेरीज,वजाबाकी होते**
**कितीही प्रयत्न केले तरी बाकी शुन्य उरते.**

अलिकडे गाव आणि शहरातील अंतर वाढत आहे.माणसं गावातून शहराकडे चालू लागली ,की त्यांचे विचारही बदलात. परंपरा आणि वृत्ती बदलाचे दर्शन होते.अशावेळी माणसांच्या जीवनविचारातही अंतर वाढत जाते.गावातील सत्व घेऊन शहरी गेले की मग सत्वयुक्त टाकाऊ वाटते..पण ते टाकून देण्याची हिम्मत अंतर मनात होत नाही. शहरात ग्रामीण सत्व, विचार पचत नाही.खरंतर अस बरंच व्दंद असते. त्यात समन्वय साधत प्रवास सुरू राहिला तर मनामनातील अंतरही कमी होईल.. त्या गावातील पाऊलखुणा बरंच काही सांगणा-या आहेत त्या विषयी कवयत्री लिहितात..

**गावच्या वाटेवर दिसतात जरा पाऊलखुणा**
**साद देऊनी बोलावती मला ओळखी जुन्या**
**जिव्हाळा आहे पण जराशी मी बदलेली**
**जुन्या नव्याचा मेळ घालत जराशी हरवलेली.**

जीवन म्हणजे संघर्षाची गाथा असते. प्रत्येकाच्याच वाटयाला संघर्ष असतो..त्याच्याशी दोन हात करत पुढे जायचे असते. झुजंताना प्रतिकूलतेशी लढावेच लागते. माणसांच्या आयुष्यात जसे हार घालणारे असतात तसे प्रहार करणारेही असतात. किंबहूना प्रहार करणारे हात अधिक असतात..म्हणून माघारी फिरावे असं नाही. आपले ध्येय जर पक्के असेल तर संघर्षाची शक्ती मिळत जाते हे पण खरे. ही लढाई कवयत्री आपल्यात करत गेल्या आहेत आणि
जिंकतही गेल्या आहेत.. याचे कारण ध्येयाची वाट पक्की होती आणि त्याचवेळी दुःख आहे म्हणजे सुख येणार याची शाश्वती होती..आशावादी होत्या त्याबददल त्या लिहितात..

**काळ सरला कधी**
**उमगले नाही मला सरल्या किती सदी**
**ध्येय पक्के होते माघारी ना फिरले मधी**
**माहित होते मला दुःख येते सुखाच्या आधी**

जीवन म्हणजे केवळ शब्दांचे पांडित्य नाही.जे बोलावे ते चालावे..ही वाट सोपी वाटत असली तरी ती तितकीशी सोपी नाही..शब्दांच्या जंजाळत्वात फार तर पांडित्य सिध्द करता येईल..पण वाणी आणि आचरण एक ठेवत प्रवास करणे सोपे नाही..मात्र त्याबददलचे वास्तव त्या आपल्या भोवती दिसत असले तरी त्यांची खंत त्यांच्या मनात कायम आहे..त्यामुळे व्यवस्थेत पसरलेला काळोख आपल्याला कमी करायचा असेल तर वाणी आणि
आचरण एक असणाऱ्यांची गरज आहे.ते नसल्याने हा काळोख संपणार नाही..त्याबददल मनातील भावनांचे दर्श घडविताना कवयत्री लिहितात..

**शब्दाने पांडित्य सिध्द करणे फारसे कठीण नाही**
**पण वाणीला आचरणाशी जोड देणे सोपे नाही**
**शब्द आणि कृतीची एकरूपता इथे नाही**
**काळोखाच्या राज्यात पणतीचा प्रकाश पुरेशा नाही**

जीवनात यश प्राप्त करायचे असेल तर स्वप्न पाहा असे सांगितले जाते.त्या स्वप्नांची वाट केवळ पाहून यशाच्या जवळ जात नाही. माणसं जी स्वप्न पाहातात त्यात लहान, मोठे असे काही नसते.. प्रत्येक वेळी त्याचा पाठलाग करताना स्वतःला जोखणे घडत जाते. अशावेळी त्याचा पाठलाग करण्यासाठी मनात जिदद कायम ठेवावी लागते. त्याशिवाय ते पूर्ण होत नाही. स्वप्न केवळ पाहून पूर्ण होत नाही तर त्यासाठी कष्टाची सतत वाट चालावी लागते.त्याबददलचा त्यांची विचाराची वाट दाखविताना त्या लिहितात..

**स्वप्नात मोठे आणि छोटे असे काही नसते**
**मात्र पाहताना ते आपल्याला जोखत असते.**
**जिदद हवी आपल्यात तरच ते पूर्ण होते**
**कष्टाविना नाही रे ते कधी सत्यात येते**

आपल्या समाजाचे अत्यंत सुक्ष्म निरिक्षण त्यांनी अनुभवा अंती प्रतिपादन केले आहे. माणसं जितके म्हणून पुस्तकांने शहाणी होत नाहीत त्यापेक्षा कितीतरी शहाणपण हे अनुभवातून येत असते. आपण पुस्तके वाचता वाचता माणसं वाचायला हवी आहे.त्या माणसांचा अनुभव घेताना त्यांनी समाजात बोलणारी आणि चालणारी वाट एक असत नाही हे त्यांनी नमूद केले आहे. इथे कष्ट सोसण्यापेक्षा वरवर जे काही मिळेल त्याचा पाठलाग करण्यात अनेकांना आनंद आहे. इथे दुःख स्वतःला होत नाही. त्यापेक्षा अधिक दुःख इतरांच्या सुखाने होते आहे.वास्तव सांगताना त्यांनी मांडलेल्या चार ओळी समाजाचे वास्तव सांगून जातात.
ओठात एक, पोटात एक या जगाची रीत न्यारी फारशी प्रिय नाही इथे कष्टाची भाकरी वरवरच्या मुलाम्याला भुलती पहा सारी परी सदभाव नाही इथे कुणाच्या अतंरी समाजात माणसं जे काही बोलत जातात तेव्हा आपण नेमकी कोणती वाट चालावी हे कळत नाही.भोवताल फार काही दिशादर्शक नाही..सारं व्दंद उभे आहे.. मनाची घालमेल असतेच मनामनात..ती मनाची भावना व्यक्त करताना चराचराकडे काय मागावे असे प्रश्न विचारत आपण या नव्या पिढीला तरी काय सांगावे असाही सवाल करतात..मनामनातील खंत अनेक चारोळ्यांतून व्यक्त होतात. त्या संदर्भाने ते लिहितात..

**कळत नाही कसे वागावे**
**उमजत नाही कसे जगावे**
**चराचराकडे काय मागावे**
**नव्या पिढीला काय सांगावे**

आपल्या समाजाचे वास्तव भयान आहेच.अनुभवात भिन्न आहेत.जीवनाची वाट सारीच प्रकाशमान असत नाही अनेकदा काटया तुडवत चालत राहावे लागतात.आज ज्यांच्याकडे सोन आहे ते विकले जाईल याची खात्री नाही.मात्र तरीसुध्दा सत्वाची आणि सत्याचे बोल सांगताना त्या लिहितात ज्याच काम प्रभावी आहे त्याला ते सिध्द करण्यासाठी शब्दांची गरज उरत नाही. जो माणूस बांधिलकी पत्कारत काम करतो त्याला आपल्या कामाचा गाजावाजा करावा लागत नाही..जीवनाच्या या सत्याच्या वाटेचा परिचय व्हायला हवा त्या संदर्भाने त्या
लिहितात..

**ज्याचं काम बोलतं**
**त्याला बोलावे लागत नाही**
**बांधीलकी पत्करली ज्यांने**
**त्याला सांगाव लागत नाही**

माणसं कष्ट असताना,वेदना सोसत का जगतात असा प्रश्न जेव्हा पडतो तेव्हा त्यामागील कारण असते..मनातील आशा. अगदी कितीही कडत उन्हाळा असला तरी तो उन्हाळा सुसह्य होतो तो पावसाची आठवण आल्याने..माणसं कितीही कष्ट सोसत आपला प्रवास सुरू ठेवतात.त्यांच्या या प्रवासातील वेदना ते सोसत राहातात याचे कारण त्या कष्टांच्या वेदना सोसताना यश मिळेल ही आशा असते.त्या यशाच्या खुणा जाणवू लागल्या की,माणसं अधिक सोसत जातात हे जीवनातील वास्तवाचे धडे चारोळीतून देताना त्या लिहितात..

**तप्त उन्हाळाही सुसह्य होतो**
**जेव्हा पावसाची आठवण येते**
**कष्टांचेही काही वाटत नाही**
**जेव्हा यशाची चाहूल लागते.**

चारोळी संग्रहात एकूण 71 चारोळ्या आहेत. जीवनातील वास्तवाचे दर्शन घडविताना अनेक ठिकाणी जीवनवाटा सुलभ करण्याचा प्रयत्नही त्या करतात. अत्यंत साध्या सोप्या भाषेत विचाराची मांडणी वाचकांना निश्चित भावत जाणारी आहे.जगण समृध्द करणा- या या चारोळ्या वाचायला हव्या असं पुन्हा पुन्हा वाटत जाते.अर्थात या केवळ कवितांच्या ओळी आहेत असे नाहीत तर त्या पलिकडे जीवन चिंतन त्या शब्दांतून व्यक्त झाले आहे. त्यामुळे वाचून त्या ओळींचा आनंद घ्यावा आणि सोडून द्याव्यात अशा त्या ओळी निश्चित नाही.. तर त्या ओळी माणसाला आत्मचिंतन करण्यास भाग पाडतात. एकूणच चारोळी संग्रह वाचनीय आणि चिंतनीय झाला आहे. प्रस्तावना जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ न.म.जोशी यांची लाभली असून पाठराखन घनश्याम पाटील यांनी केली आहे.

पुस्तकाचे नाव-वाटले मला जे
**कवी-डॉ. शकुंतला काळे-गावडे**
**प्रकाशक- चपराक,पुणे**
**पाने-80 किंमत-80**

आस्वाद संदीप वाकचौरे

# धर्माबादच्या तहसीलदारांना अभय कोणाचे ?

## तहसीलदार शिंदे यांच्या गैरकारभाराची चौकशी करा: अन्यथा अमर उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** तालुक्याचे तहसीलदार दत्तात्रय शिंदे यांनी पदभार स्वीकारल्यापासूनच यांची कारकीर्द वादग्रस्त राहिलेली आहे. साधारणत : कोणत्याही तहसीलदाराचा कार्यकाळ तीन वर्षाचा असतो.पण धर्माबादच्या तहसीलदारांचे तीन वर्षी उलटूनही त्यांची बदली मात्र होत नाही. त्यामुळे धर्माबादच्या तहसीलदारांना अभय कोणाचे याविषयी उलट सुलट चर्चा रंगू लागल्या आहेत. तसं बघितलं तर तहसीलदार दत्तात्रय शिंदे यांची भूमिका नेहमीच संशयस्पद राहिली आहे. एक, त्यांच्या कालखंडात अवैधरित्या चालणारा एक रेतीचा हायवा रंगेहात पकडून तो तहसील कार्यालयात आणला होता.मात्र या महोदयांनी त्यावर काय कारवाई केली ? आजपर्यंत गुलदस्त्यातच आहे.
 दोन,महसूल प्रशासनाच्या डोळ्या देखत मोठ्या प्रमाणात अवैध मुरूम उत्खनन झाले. प्रशासनाला लक्ष्मी दर्शन घडवून परवानगी ५०० बरासची घ्येयाची व उत्खनन १००० बरास करायचे.बरं हे सर्व तहसीलदारांना माहित नव्हते असे कसे म्हणता येईल ?तीन, उपविभागीय अधिकारी राजेंद्र शेळके हे रजेवर गेल्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात तहसीलदारांकडे प्रभारी चार्ज देण्यात आले. मात्र या संधीचा लाभ घेत, टेबलखालून व्यवहार होऊन अनेक व्यवहार होऊन तहसील कार्यालयातून एसटीचे अनेक जात प्रमाणपत्र निर्गमित केले जात असल्याची ही चर्चा आहे. चार, तलाठी कदम यांच्यावर तहसीलदार मेहरबान असल्याचे चित्र आहे. हे तलाठी महोदयाची ड्युटी आहे धर्माबादला पण कामकाज चालवीतात नांदेडहुन. तहसील कार्यालयात बायोमेट्रिक आहे का ? असेल तर कर्मचारी थंब करतात का ? यावर न बोललेच बर अशी स्थिती आहे.पाच शिंदे यांची लातूर जिल्हा अधिकारी कार्यालय येथे बदली झाली आहे. अद्यापही चार्ज सोडला नाही. परत एक बार धनलक्ष्मी सुदर्शन तर केले नाहीत ना ? असे उलट सुलट चर्चे सर्व सामान्य जनतेत होत आहे. मागील अधिवेशनात विधान परिषदेचे आमदार अमर राजूरकर यांनी तहसीलदार शिंदे यांच्या गैरकारभाराची चौकशी करून त्यांना निलंबित करावे अशी मागणी केली होती. तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील ह्यांनी तसा आदेशही निर्गमित केल्याची चर्चा होती. मात्र मोठी उलाढाल करून हा आदेश थांबिविण्यात आल्याचे बोलले जाते. या सर्व प्रकरणाची चौकशी व्हावी अशी मागणी जनतेतून होत आहे. सरकार यावर काही करणार का याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे.

# समृद्धी महामार्गावर बसची टँकरला धडक

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** नागपूरहून पुण्याकडे जाणाऱ्या खासगी बसने चालत्या टँकरला मागील बाजूने धडक दिली. रात्रीची वेळ असल्याने प्रवासी गाढ झोपेत असताना वरील बर्थ वरून खालच्या बर्थवर कोसळले. सुदैवाने यामधे जीवितहानी टळली असली तरी १२ जण गंभीर जखमी झाले. नागपूरकडून पुण्याकडे खासगी बस जात असताना चालत्या टँकरला मागून धडकली. रात्रीची वेळ असल्याने प्रवाशी गाढ झोपेत असताना हा अपघात झाला सुदैवाने यामधे कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी यामधे हर्षल रामदास पाटील ४१ वर्षे, योगिता गणेश भुते ४७ वर्षे, कुणाल सुनील भोजने २० वर्षे, अश्विन विलास मोरकर २४ वर्षे, मोनाली गाडेकर ४२ वर्षे, राकेश बुते ३८ वर्षे, सायली धाडवे ४२ वर्षे, नवनाथ मोहिते ४२ वर्षे, अभिषेक वानखडे ४० वर्षे, मंजू योगेश बुते ४० वर्षे, वैष्णवी काळे २४ वर्षे, सुमित सावितकर ४५ वर्षे, रा. नागपूर अशी जखमीचे नावे असून जखमींवर कारंजा रुग्णालय येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अमरावती येथे दाखल केले.

# वेरुळ येथील डमडम तलावामध्ये बुडून दोन मुलांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरूळ येथील शिवकालीन डमडम तलावामध्ये एक तरुण बुडत असताना एक दूसरा त्याला वाचवण्यासाठी पाण्यात गेला असता तोही बुडाला यात दोघांचा मृत्यु झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी दुपारी 12 वाजेच्या सुमारास घडली.



संकेत गुलाबसिंग बह्मणावत ( 17 वर्ष ) आणि आयुष त्रियंबक नागलोद ( 7 वर्ष ) दोन्ही राहणार तलाववाडी वेरुळ असे पाण्यात बुडुन मृत्यु झालेल्या मुलांची नावे आहेत. या बाबत अधिक माहिती अशी की, शिवकालीन डमडम तलाव परिसरात संकेत बह्मणावत ( 17 वर्ष ) आणि आयुष नागलोद ( 7 वर्ष ) दोन्ही दुपारी शेळ्या चारण्यासाठी गेले होते.नंतर संकेत पोहण्यासाठी डमडम तलावात उतरला मात्र त्याला पाण्याचा अंदाज ना आल्याने तो बुडाला दरम्यान त्याला वाचवण्यासाठी संकेतने पाण्यात उडी मारली मात्र त्याला पोहता येत नस्लयाने तो ही पाण्यात बुडाला व या घटनेत दोन्ही मुलांचा दुर्दैवी मृत झाला. दरम्यान परिसरातील लोकांना दोन्ही मुले गायब असल्याचे समजले. नंतर त्यांनी शोध घेतला असता ते पाण्यात बुडाल्याचे स्पष्ट झाले.
तदनंतर वेरूळ येथील ग्रामस्थांनी डमडम तलाव परिसरात येवून बुडालेल्या दोघा मुलांचा शोध घेतला. परंतु, ते आढळून आले नाही नंतर वेरुळ गावाचे पोलीस पाटील रमेश ढिवरे यांनी खुलताबाद पोलीसांना यबाबत ची माहिती दिली. माहिती मिळताच खुलताबाद पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संजय बहुरे, बीट जमादार राकेश आव्हाड, संजय ठोंबरे घटनास्थळी दाखल झाले. लागलीच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. तोपर्यंत वेरूळ येथील तंटामुक्ति अध्यक्ष सुरेश नाना ठाकरे, कैलास मोरे, संजय सोनवणे, सोनाजी ठाकरे हे तलावात उतरले व संकेत व आयुष यांचा मृतदेह तीन तासाच्या अथक परिश्रमानंतर पाण्याबाहेर काढला. लागलीच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.
 व नंतर मृतदेहाना वेरुळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले व येथील वैद्यकिय अधिकारी डॉ एम एम चोपडे यांनी शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिले. सदरील घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरल्याने वेरुळ व परीसरातील नागरिकांनी बघण्यासाठी डमडम तलाव परिसरात एकच गर्दी केली होती.

# श्रेष्ठ कवितेचा जन्म वेदनेतूनच होतो : फुलारी

आधुनिक केसरी न्यूज



**परभणी :** महाकाव्यापासून ते आजपर्यंतच्या कवितेचा इतिहास पाहिला तर श्रेष्ठ कवितेचा जन्म हा वेदनेतून होतो. चांगल्या कवितेच्या बुडाशी वेदनाच असते. प्रत्येक कवी आपल्या कवितेच्या निर्मिती प्रक्रियेबद्दल बोलत असला तरीही हे बोलणे कधीच परिपूर्ण असू शकत नाही कारण कवितेच्या निर्मिती प्रक्रियेविषयी एकाच दृष्टीकोनातून भाष्य केले जावू शकत नाही असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी देविदास फुलारी यांनी केले. येथील मराठवाडा साहित्य परिषद परभणी शाखा व कुलकर्णी परीवाराच्या वतीने साहित्य, सांस्कृतिक चळवळीतील निष्ठावान मार्गदर्शक कार्यकर्ते देविदास कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजीत कार्यक्रमात फुलारी यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मसापच्या शाखेच्या अध्यक्षा सौ. सरोज देशपांडे या होत्या. कवितेची निर्मिती प्रक्रिया: एक दृष्टीक्षेप' या विषयावर भाष्य करताना फुलारी यांनी रामायण, महाभारत व संत साहित्यातील अनेक महत्त्वाचे दाखले देत कवितेची निर्मिती प्रक्रिया उलगडून दाखवली. संत जनाबाई यांच्या अभंगातून स्त्री जाणीवेची अत्यंत उन्नत अशी अभिव्यक्ती झाल्याचे ते म्हणाले. आकाशात एखादी वीज चमकुन जावी तशी कविता मनात अकस्मात अवतरते असे फुलारी म्हणाले. नवोदित कवींनी खूप वाचले पाहिजे, अनुभव पूर्णपणे पचवून व्यक्त झाले पाहिजे. निर्मितीकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले पाहिजे असेही त्यांनी सांगितले. यावेळी फुलारी यांनी देविदास कुलकर्णी यांच्या साहित्य चळवळीतील कार्याचा आढावा घेवून त्यांच्या व्यक्तिमत्वाला उजाळा दिला. अध्यक्षीय समारोप सरोज देशपांडे यांनी केला. प्रारंभी देविदास कुलकर्णी यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी फुलारी यांच्यासह श्रीमती सुनंदा कुलकर्णी, कुलकर्णी कुटुंबीय, डॉ. आसाराम लोमटे, मसाप शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी मोहन कुलकर्णी यांनी केले. मान्यवरांचे स्वागत रमाकांत कुलकर्णी, बा.बा. कोटंबे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मारोती डोईफोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन शाखेचे कार्यवाह प्रा. भगवान काळे यांनी केले. या कार्यक्रमास ज्येष्ठ कवी केशव बा. वसेकर, तुकाराम खिल्लारे, भास्करराव ब्रम्हनाथकर, संजय कुलकर्णी, दुर्गेश कुलकर्णी, महेश मोरे, शंकर वाडेवाले, रमेश गोळेगावकर, डॉ. रत्नाकर लोंढे, अभिजीत ब्रम्हनाथकर, अश्विनी कुलकर्णी-ब्रम्हनाथकर, प्रा. सखाराम कदम, पंडीत निर्मळ, प्रा. सचिन खडके, प्रा. दत्ता शिंदे, अरूण चव्हाळ, त्र्यंबक वडसकर, सुरेश हिवाळे, माणिक रासवे, पंडीत पाटील, शरद ठाकर, संजय चिटणीस, अनिल मुळजकर, सुवर्णा मुळजकर, मधुरा उमरीकर, गंगाधर गायकवाड आदींसह कुलकर्णी कुटुंबिय व शहरातील साहित्य रसिक मोठ्या संख्येने हजर होते.

# संत ज्ञानेश्वर माऊलींचे जीवनचरित्र व्याख्यान मालेची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** अपार वेदना भोगूनही अत्यंत शांत व स्थितप्रज्ञ असणारा महात्माच समाजाला वेदना मुक्तीचा मार्ग दाखवु शकतो किंवा सांगू शकतो. याचे श्री संत ज्ञानेश्वर माऊली इतकं उत्तम उदाहरण मला वाटते जगाच्या इतिहासात शोधूनही सापडणार नाही असे माऊली विषयी गौरवोद्गार प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी ( वतनी ) काढले.
 श्री बालाजी मंदिर, टिळक नगर, छत्रपती संभाजी नगर येथे दि. १९, २०, व २१ मे २०२३ रोजी श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचे जीवन चरित्र या विषयावर प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी ( वतनी ) यांचे तीन दिवसीय व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यान मालेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी ( वतनी ) यांनी अतिशय रसाळ वाणीतून भावूकपणे माऊलींचे चरित्र कथन केले तेव्हा रसिकांचे डोळे पाणावले होते. तिसऱ्या दिवशी "माऊलींचा संजीवन समाधी सोहळा" कथन करतांना ते म्हणाले की, माऊलीवर व त्यांच्या भावंडावर त्याकाळी समाजाने 'संन्याशाची पोरं' म्हणून अतोनात छळ केला. त्यांच्या आई-वडीलांना देहांत प्रायश्चित्त सुनावले आणि मुलांच्या कल्याणासाठी त्यांनी ते स्विकारलेही. पण त्यानंतरही त्या निष्ठूर



समाजाने ह्या लहान अनाथ मुलांचा छळ चालूच ठेवला. पण याविषयी कसलीही तक्रार नकरता तो निमुटपणे सहन केला, आणि पैठणच्या विद्वसभेत माऊलींनी सद्गुरू निवृती नाथांच्या अनुमतीने आपल्या ज्ञानसंपन्न वैराग्य भावाने आपला अधिकार सिध्द केला आणि शुद्धिपत्र मिळविले. माणूस जन्माने नाही तर कर्माने कर्तृत्ववाने मोठा होतो याचा आदर्श या चार भावंडांनी समाजाला घालून दिला. माऊलींच्या जीवनातील अनेक भावपूर्ण प्रसंगाचे वर्णन प्रा.कुलकर्णी सरांनी सविस्तरपणे केले. विशेषतः ताटीचे अभंग, कृष्णाजीपंत देवकुळे मामांच्या घरी श्राद्धाचा प्रसंग, रेड्यामुखी वेद वदवीलेला प्रसंग, मृत सच्चिदानंद बाबाला जागे केलेला प्रसंग, नेवासे येथे ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी रचना प्रसंग, संत नामदेव महाराजांसोबत केलेली यात्रा व त्यातील प्रसंग अशा अनेक प्रसंगाचे रसाळ वर्णन त्यांनी केले तेव्हा काही भावूक प्रसंगी तर श्रोत्यांचे डोळे पाणावले.
 शेवटी प्रा.कुलकर्णी ( वतनी ) सर म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या व तणावग्रस्त जीवनात आपल्याला विशेषतः तरूणाला संतांचे चरित्र दीपस्तंभासारखे मोलाचे कार्य करते. जीवनाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मिळतो. मऊलींच्या किंवा संतांच्या चरितवराच्या वाचनाने, श्रवणाने, चिंतनाने किंवा मननाने आपल्यातील नकारात्मक विचारांचे दहन होऊन सकारात्मक विचारांचा उगम होतो. आणि जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची दिव्यदृष्टी प्राप्त होते. त्यामुळे सर्वांप्रती राग, द्वेष, मत्सर, अहंकार हा भाव नष्ट होतो आणि "भुता परस्परे पडो मैत्र जीवांचे" हा मैत्री भाव जागृत होऊन हे जीवन अधिक सुखी, समाधानी, आनंदी आणि समृद्ध बनतं. यासाठी अशाप्रकारच्या संत चरित्र व्याख्यान माला मोठ्याप्रमाणात आयोजित केल्या जाव्यात. सुरूवातीला माऊलींच्या प्रतीमेचे पुजन करून मंदिर संस्थानच्या वतीने श्री शंकर निनावे काकांच्या हस्ते प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी ( वतनी ) यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे श्रोत्यांच्या वतीने प्रा.लता कुलकर्णी यांच्या हस्ते प्रा.कुलकर्णी सरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.दिपाली नीनावे यांनी केले तर शेवटी त्यांनीच आभारप्रदर्शन केले व पसायदानाने व्याख्यान मालेची सांगता केली. कार्यक्रमास श्रोत्यांची उपस्थिती मोठ्याप्रमाणात होती.

# जयंत पाटलांना ईडीने पाठवलेल्या नोटीसप्रकरणी तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**बी. डी. रामपूरकर**
**जिंतूर :** २३ मे, रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिंतूर यांच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांना सूडबुद्धीने पाठवलेली ईडी कार्यालयाची नोटीस प्रकरणी तहसीलदार जिंतूर यांना निवेदन देण्यात आले. त्यात महाराष्ट्रात विरोधकांचा आवाज दडपण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात असून लोकशाही मूल्यांना पायदळी तुडवून सत्तेचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ईडी, सीबीआय अशा केंद्रीय यंत्रणांचा दुरुपयोग करून सक्षम विरोधी पक्षांची मुस्कटदाबी केली जात आहे. त्यात माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर १०० कोटी पेक्षा जास्त रकमेच्या भ्रष्टाचाराचा ठपका ठेवला गेला व त्यातून त्यांना १३ महिने तुरुंगात राहावे लागले मात्र चौकशीत काहीही निष्पन्न झाले नाही. माजी मंत्री नवाब मलिक यांना सुद्धा त्यांनी प्रशासनातील काही चुकीच्या गोष्टी लोकांसमोर आणल्यामुळे त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. त्याचप्रमाणे जेष्ठ नेते हसन मुश्रीफ व अन्य महाविकास आघाडीच्या नेत्यांना सुद्धा ईडी कार्यालयाची भीती दाखवून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्याकडून सातत्याने होताना दिसून येत असून भाजप सत्तेत असलेल्या राज्यात लोकशाही मूल्यांना पायदळी तुडवून सत्तेचा गैरवापर केला जात आहे. त्यामुळे महाराष्ट्राची राजकीय संस्कृती लोप पावत असून विरोधकांना संपविण्याचे असे विध्वंसक राजकारण देशाच्या व राज्याच्या हिताचे नाही. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष व प्रमुख नेते जयंतरावजी पाटील यांना याच भावनेतून सूडबुद्धीने ईडी कार्यालयाची नोटीस पाठवण्यात आलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनमाणसांमध्ये टोकाची भावना आहे. त्या भावना राज्यसरकार व केंद्र सरकारला आपल्या मार्फत पाठवण्यात याव्यात तसेच जयंत पाटील यांच्या सारख्या चारित्र्य संपन्न व निष्कलंक व्यक्तिमत्व असणाऱ्या नेत्याचे खच्चीकरन व्हावे याच भावनेतून केंद्रीय यंत्रणाच्या नोटीस पाठवून त्यांना नाहक त्रास दिल्या जात आहे. या सर्व बाबतीत राजकीय हेतूने भाजप सरकार पडद्या मागून खेळ करत असल्याचा आम्हा सर्वांचा मानस आहे. आशा कारवाया तत्काळ थांबविण्यात याव्यात अन्यथा जिंतूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. यातून होणाऱ्या कायदा व सुव्यवस्था सारख्या प्रश्नांची सर्वस्वी जवाबदारी शासन व प्रशासनावर राहील या आशयाचे लेखी स्वरुपात निवेदन देण्यात आले. यावेळी मा.आ. विजयराव भांबळे साहेब, प्रसादराव बुधवंत, मनोज थिटे, बाळासाहेब घुगे, रामराव उबाळे, अभिनय राऊत, विठ्ठल घोगरे, गणेशराव ईलग, दल्मीर पठाण, चंद्रकांत बहिरट, शाहेद बेग मिर्झा, अहमद बागबान, रमेश गीते, श्रीकृष्ण थिटे, मकसूद पठाण, सिधीक्की, राठोड, ज्ञानेश्वर निर्मळ, विश्वंबर पडघन, दिनकर आलाटे, दिनकर सातपुते, माणिक सानप, असलम कुरेशी, दिगंबर कुटे, रामू काका अंभुरे, कपिल जाधव, देशमुख, यांच्या सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# उद्धव ठाकरेंनी दिला गंभीर इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आज ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर भेट घेतली. यावेळी सर्व प्रमुख नेत्यांमध्ये विरोधी पक्षांच्या आघाडीवर सविस्तर चर्चा झाली. अरविंद केजरीवाल आणि भगवंत मान शरद पवारांचीही भेट घेण्यासाठी जाणार आहेत. या भेटीनंतर तिन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. यावेळी उद्धव ठाकरेंनी बोलताना एक गंभीर शक्यता वर्तवताना भीती व्यक्त केली आहे. आपचे प्रमुख नेते अरविंद केजरीवाल गेल्या काही दिवसांत दुसऱ्यांदा मातोश्रीवर आलेत. नाते जपण्यासाठी शिवसेना आणि मातोश्री प्रसिद्ध आहे. काही लोक फक्त राजकारण करतात. आम्ही मात्र राजकारणाच्या पलीकडे जाऊन नाते जपत असतो. राजकारण आपल्या जागी असते. येणारे वर्ष निवडणुकीचे आहे. यावेळी जर ट्रेन सुटली, तर आपल्या देशातून लोकशाही गायब होईल. लोकशाहीला वाचवण्यासाठी देशातून जे लोकशाही हटवू इच्छितात, त्यांनाच मी विरोधी पक्ष म्हणेन, असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. गेल्या काही दिवसांत सर्वोच्च न्यायालयाने दोन निकाल दिले आहेत. एक शिवसेनेच्या बाबतीत आणि दुसरा दिल्लीच्या बाबतीत. लोकशाहीत लोकप्रतिनिधींचं सर्वात जास्त महत्त्व असते. दिल्ली सरकार आणि 'आप'च्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय लोकशाहीसाठी आवश्यक होता. पण त्याविरोधात केंद्र सरकारने अध्यादेश काढला. आता असे दिवस येतील की राज्यांमध्ये निवडणुका होणारच नाहीत. फक्त केंद्रात निवडणुका होतील. त्यातही २०२४ च्या निवडणुकांमध्ये जनता काय निर्णय देते, त्यावर बरंच काही अवलंबून असेल, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी चिंता व्यक्त केली. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाविरोधात देशभरातील विरोधी पक्ष एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सर्वच विरोधी पक्षांकडून तशी अपेक्षाही बोलून दाखवली जात आहे. मात्र, विरोधी पक्षांमध्ये एकमत करण्याचे याआधीचे प्रयत्न फसल्यामुळे यावेळी तरी विरोधकांना यश येईल का? अशी शंका उपस्थित केली जात आहे. काही दिवसांपूर्वीच बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवारांची भेट घेतली होती. त्याआधी ममता बॅनर्जी शरद पवारांच्या भेटीला आल्या होत्या. आता अरविंद केजरीवाल आणि भगवंत मान यांच्या भेटीमुळे विरोधकांच्या एकजूटतेसाठी प्रयत्न सुरू झाल्याचं चित्र दिसून येत आहे.

# गायीच्या पुण्यस्मरण कार्यक्रमाने तेहतीस कोटी देवाचे मिळते पुण्य

## ह.भ.प. सोनाली करपे : गायीच्या वर्षश्राद्धाचे जिल्हाभर कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**जयप्रकाश बागडे**

**बालमटाकळी :** हिंदू धर्मात गाय ही पवित्र मानली जाते, गायीमधे 33 कोटी देवांचे वास्तव्य असल्यामुळे हिंदू धर्मात तिला सर्वजण पवित्र मानतात, तिच्या मृत्यूनंतर तिचे वर्ष श्राद्ध केले, न भूतो न भविष्यती असा हा कार्यक्रम करण्याचे भाग्य मला मिळाले, गायीचे वर्ष श्राद्ध करून मनाचा मोठेपणा दाखवलेल्या दत्तात्रेय बामदळे या शेतकऱ्याच्या कुटुंबास गायीमधील 33 कोटी देवांचे पुण्य मिळणार असल्याचे गौरवोद्गार ह.भ.प. सोनालीताई करपे यांनी काढले.

शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील सधन शेतकरी दत्तात्रय मुरलीधर बामदळे या शेतकऱ्याच्या गायीचे प्रथम वर्षश्राद्धनिमित्त कीर्तनकार ह.भ.प. सोनालीताई करपे यांच्या कीर्तनाचे व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कीर्तनातून प्रबोधन करत होत्या.



बालमटाकळी येथील सदन शेतकरी दत्तात्रय मुरलीधर बामदळे यांनी एक लहान कालवड घेतली होती. तिने किमान 19 वेत दिले होते. 30 वयानंतर ठीक आहे मरण पावली. आपण आजपर्यंत या गायीची घरातील एक कुटुंबाचा भाग म्हणून सेवा केली आणि तिने देखील आपल्याला दुध दुभत्यासह लहान-मोठे जनावरे दिल्याने गाय ही माय असते म्हणून दत्तात्रय बामदळे यांनी तिच्या मृत्यूनंतर तिची माणसाप्रमाणेच विधिवत पूजा करून अंत्यविधी केला होता. दर महिन्याला गायीच्या नावाने एक मुलगी दर महिन्याला जेवू घालून तिचे वर्ष श्राद्ध करायचे असा विचार त्यांच्या मनात आल्याने मंगळवार रोजी गायीचे वर्षश्राद्धनिमित्त गायीच्या प्रतिमेचे विधिवत पूजन दत्तात्रय बांमदळे व पत्नी हिराबाई बामदळे व कुटुंबाने केले होते. ह.भ.प. कीर्तनकार सोनालीताई करपे यांनी आपल्या कीर्तनातून प्रबोधन करताना म्हटले की , गाय ही माय असते आपण तिच्या नावाने एक मुलगी दर महिन्याला जेवू घालून गाईचं आपल्या घरच्या कुटुंबाप्रमाणे तिचं वर्ष श्राद्ध केल्याने गाई मधील 33 कोटी देवाचे पुण्य या कुटुंबाला मिळणार आहे. आजपर्यंत कधीही हा आगळावेगळा कार्यक्रम कुणीही भविष्यात केला नसावा हा कार्यक्रम माझ्या कीर्तनाने संपन्न झाल्याने मला देखील गाईचे पुण्य व कार्यक्रम करण्याचे भाग्य मिळाले असल्याचे गौरव उद्गार सोनाली ताई करपे यांनी काढले. या कार्यक्रमाचे पडसाद शेवगाव तालुक्यासह अहमदनगर जिल्ह्यात उमटल्याने बांमदळे कुटुंबीयाचे सर्वत्र कौतुक केल्या जात असून महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली असून कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ. मुरहरी केळे मुख्य अभियंतापदी रुजू

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महावितरण छत्रपती संभाजीनगर परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी डॉ. मुरहरी सोपानराव केळे मंगळवारी (23 मे) रुजू झाले. याआधी ते महावितरणच्या मुंबईतील सांघिक कार्यालयात कार्यरत होते.

वीज वितरणाच्या क्षेत्रातील तज्ञ व विश्लेषक म्हणून ओळख असणारे डॉ. केळे हे मूळचे धाराशिव जिल्ह्यातील केळेवाडीचे रहिवासी आहेत. तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये ते कनिष्ठ अभियंता म्हणून 1991 मध्ये रुजू झाले. त्यानंतर त्यांनी विविध वरिष्ठ पदांवर त्यांनी चिपळूण, गुहागर, खेड, भिवंडी, मुंबई, पेण, नागपूर आदी ठिकाणी काम केले आहे. तर अकोला परिमंडलासह महावितरणच्या मुख्यालयात वितरण व वाणिज्यिक, तांत्रिक आस्थापना, देयके व महसूल या विभागांचे मुख्य अभियंता म्हणून काम केले आहे. मध्य प्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीमध्ये संचालक (तांत्रिक), महावितरणमध्ये संचालक (वाणिज्य) तसेच वीजपुरवठ्यासाठी अतिशय आहानात्मक असलेल्या त्रिपुरा राज्याच्या विद्युत मंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून डॉ. मुरहरी केळे यांनी उल्लेखनीय काम केलेले आहे.

संत साहित्याचे गाढे अभ्यासक व साहित्यिक असलेले डॉ. मुरहरी केळे यांची मराठी व इंग्रजीमध्ये पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. अनेक पुस्तकांचे त्यांनी संपादनदेखील केले आहे. सोबतच



वीज वितरणासह प्रामुख्याने 'स्मार्ट मीटर'संबंधी त्यांनी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत. नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने त्यांना 'पीएचडी' पदवी प्रदान केली आहे. तसेच अभियांत्रिकीसह व्यवस्थापन, विधी, वाणिज्य, नियामक, लेखा परीक्षण आदी विषयांमध्ये त्यांनी शैक्षणिक पदव्या संपादन केल्या आहेत. विद्युत क्षेत्रातील कामाचा त्यांना सुमारे 32 वर्षांचा अनुभव आहे.

# गोमंतकीय कविता कार्यक्रम आज बेळगावात

आधुनिक केसरी न्यूज

**बेळगाव :** येथील लोकमान्य ग्रंथालयाच्या वतीने गुरुवार २५ रोजी गोमंतकीय कवि- कवयित्रींचे कवितावाचन होणार आहे. लोकमान्य ग्रंथालयाच्या साने गुरुजी सभागृहात गुरुवारी सायंकाळी ६ वाजता हे गोमंतकीय कविता हे कविसंमेलन होणार आहे. प्रसिद्ध गोमंतकीय कवयित्री चित्रा क्षीरसागर, कवी व संपादक प्रा. मोहनराव कुलकर्णी, प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, कवयित्री प्रा. पौर्मिमा केरकर, आसावरी कुलकर्णी, रजनी रायकर आणि शर्मिला प्रभू आपापल्या कविता सादर करतील. गोमंतकातील बदलती संस्कृती ही संकल्पना या कविसंमेलनाची आहे. हा कार्यक्रम बेळगाव येथील लोकमान्य ग्रंथालय, शब्दगंध कवी मंडळ, वाङ्मय चर्चा मंडळ आणि सरस्वती वाचनालय या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे. या कार्यक्रमाला रसिक वाचकांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# मुंडवाडी सोसायटीच्या चेअरमनपदी बबनराव बनसोड यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मुंडवाडी येथील विविध विकास सोसायटी चेअरमनपदी बबनराव बनसोड तर व्हाइस चेअरमनपदी भिमदेव जाधव यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी सोसायटीचे संचालक रामेश्वर घनकर,माधवराव तायडे, जनार्धन बारगळ, मगनदास राठोड, जयलाल राठोड, मगन राठोड, योगेश बारगळ, प्रकाश राऊत, ज्योती रामेश्वर शिंदे, वछलाताई प्रल्हाद राठोड, यशोदाबाई सुभाष तिळवण यांची उपस्थित होते. यावेळी मुंडवाडी व मुंडवाडी तांडा येथिल सर्व ग्रामस्थांनी स्वागत केले. यावेळी शामराव राठोड, विठ्ठल राठोड, विष्णु राठोड,काकासाहेब कवडे, भगवान बारगळ, रमेश घनकर, काकासाहेब तायडे, रामेश्वर शिंदे, भास्कर दांडगे, महेंद्र बारगळ, रामकीसन बारगळ, अशोकराव गायकवाड, लालचंद चव्हाण, काकासाहेब बनसोड, विजय बारगळ, सोपान बारगळ,प्रल्हाद शिकारे, देविदास मगर, रमेश राठोड, पोपट राठोड, प्रल्हाद राठोड, ज्ञानेश्वर तिळवण, नारायण राठोड, देविदास जाधव व गावकरी मंडळी उपस्थित होते .



# पाण्यासाठी समाजवादीचा पालिकेवर आक्रोश

## आंदोलनाचे नियम शिकवण्याचा आयुक्तांवर आरोप

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** पिण्याच्या पाणी वितरणासाठी मनपा प्रशासनाचे नियोजन शून्य कारभारामुळे शहर वासियांना त्रास होत असल्याचा आरोप करून समाजवादी पार्टीचे सर्व पद अधिकारी व कार्यकर्ते मनपा आयुक्तावर धडकले. पालिका अधिकारी व भारतीय जनता पार्टी यांच्याविरुद्ध घोषणा देऊन निदर्शने करण्यात आले.
धुळे समाजवादी पार्टी तर्फे पाणी संदर्भात मनपा प्रशासनाच्या उदासिन व निष्काळजी पणाच्या धोरणा बाबत अनेक वेळ निवेदने देण्यात आलेली असून पाणी वितरणात दिवसोंदिवस हिसाळ कारभार होत चालला आहे असा आरोप या ठिकाणी करण्यात आला. भर उन्हाळ्यात शहर वासियांना पिण्याच्या पाणी साठी १० ते १५ दिवस वाट पाहावी लागत आहे. मुबलक पाणी असतांना लोकांना तरसावले जात आहे. फक्त कागदावरच पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या बैठका हे दाखवुन धुळेकरांची दिशाभुल करण्यात येत आहे. कोणतीही परिणाम कारक व ठोस कार्यवाही होताना दिसत नाही. सदरील पाणी टंचाई कृत्रीम टंचाई असून मनपा प्रशासनातील अधिकारी वर्गाचे ढिसाळ नियोजन शुन्य आणी बेजबाबदार धोरणाचे फळ आहे असा आरोप करण्यात आला . लाखो करोडो रुपयांचा निधी शासनाचा पैसा पाण्याचे व्यवस्थापन व वितरणावर खर्च दाखवून धुळेकरांना पाणी मिळत नाही. महिलांना पिण्याच्या पाणी साठी भटकंती करावी लागत आहे . याचा तीव्रपणे निषेध करून घोषणाबाजी करण्यात आली. शहरवासियांना वेळेवर पाणी मिळण्या करीता त्वरीत उपाययोजना करावी अधिकच बिकट होउन नागरीकांचा संताप अनावर होईल, असे या ठिकाणी सांगण्यात आले.

# समृद्धी महामार्गावर कार उलटून अपघात

## गौड कुटुंबावर काळाचा घाला



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दोन दिवसांपूर्वी तेलंगणा येथे काकांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम आटोपून सुरतकडे जाणाऱ्या भावंडांवर काळाने घाला घातला. कार चालकाला डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे गाडी दुभाजकावर आदळून भीषण अपघात झाला. यात तिघा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एकाला उपचारादरम्यान प्राण गमवावे लागले. ही घटना बुधवार दि.२४ रोजी पहाटे तीन वाजता समृद्धी महामार्गावर छत्रपती संभाजीनगर येथे करमाड- शेकटा गावाजवळ घडली. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, संजय राजणभाई गौड ( वय ४३ ), कृष्णा राजणभाई गौड ( वय ४४ ), श्रीनिवास रामू गौड ( वय ३८ ), सुरेशभाई गौड ( वय ४१ ) ( सर्व रा. लेफ सिटी करडवा, सुरत, गुजरात ) असे अपघातात मयत झालेल्या चौघा चुलत भावंडांची नावे आहेत. गौड कुटुंबीय सुरत येथे कपड्याचा व्यवसाय करतात. गौड कुटुंबातील एका वयोवृद्ध व्यक्तीचा तेलंगणा येथे मृत्यू झाला होता. काकांच्या अंत्यविधीसाठी चारही भावंडं अर्टिगा या चारचाकी वाहनाने गेले होते. अंत्यविधीचा कार्यक्रम आटोपून चारही भावंडं सुरतकडे निघाले होते. दरम्यान करमाड - शेकटा येथील समृद्धी महामार्गावर गौड कुटुंबियांच्या वाहन चालकांचे नियंत्रण सुटले. डुलकी लागल्याने त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले. यावेळी भरधाव वेगात असलेली चारचाकी दुभाजकावर धडकली. या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर एकाला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल्यानंतर त्याने अखेरचा श्वास घेतला. गाडीत मागे बसलेला मुलगा अपघातातून बचावला आहे. दरम्यान या प्रकरणी करमाड पोलिस ठाण्यामध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# सांगोला येथे युवकाचा भोसकून खून; पाच जणांविरोधात गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** वाकी- घेरडी ता. सांगोला येथील मेन चौकात कारने दुचाकीला कट मारल्यानंतर झालेल्या वादानंतर एका २३ वर्षीय युवकाच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकून नंतर चाकू भोकसून खून झाला असल्याची घटना दि. २२ मे रोजी रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी सांगोला पोलीसात दोन महिलांसह एकूण पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल विश्वास लवटे ( वय २३ ) रा. वाकी-घेरडी ता. सांगोला असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. याप्रकरणी मोहन केराप्पा लवटे यांनी पोलीसात शिवाजी पवार, शरद शिवाजी पवार, भारत शिवाजी पवार, सौ. शांताबाई शिवाजी पवार, विजूबाई जाधव सर्व रा. वाकी- घेरडी ता. सांगोला, जि. सोलापूर यांच्याविरोधात फिर्याद दिली आहे. शरद पवार आणि भारत पवार यांनी अमोल यास धरून ठेवले होते. शांताबाई व विजुबाई यांनी मिरचीची पुड अमोलच्या तोंडावर टाकली. त्याचवेळी शिवाजी पवारने त्याच्या हातातील चाकू अमोलच्या डाव्या बरगडीत जोरात खुपसला आणि स्वतःच्या खिश्यातील मिरचीची पुड अमोलच्या अंगावर टाकली. अमोल जोरजोरात ओरडू लागल्याने जमलेले लोकं सोडविण्यासाठी पुढे येत असताना शिवाजी पवार, शांताबाई पवार व विजूबाई जाधव यांनी मिरचीची पुड लोकांच्या अंगावर टाकली. अमोलला मोठी जखम होऊन त्याच्या छातीतून रक्त निघू लागल्याने तो खाली जमीनीवर पडला. त्यावेळी अमोलला मारहाण करणारे शिवाजी पवार, शरद पवार, भारत पवार, शांताबाई पवार व विजुबाई जाधव हे गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या घरी निघून गेले. जखमी अमोल यास उपचारासाठी आणले असता, तेथील डॉक्टरांनी अमोल यास तपासून मृत घोषित केले.

# बीआरएसचे सदस्य नोंदणी अभियान सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारत राष्ट्र समिती देशपातळीवर स्वतःचा विस्तार करण्यासाठी सर्वशक्तीनिशी सज्ज झाली असून पहिला टप्प्यात महाराष्ट्रातील २८८ मतदार संघात सदस्य नोंदणी अभियान सुरू करण्याचे ठरले आहे.

नागपूर जिल्ह्यात २५ मे पासून हे नोंदणी अभियान प्रा. ज्ञानेश वाकुडकर, पूर्व विदर्भ संयोजक, यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती नागपूर जिल्हा समन्वयक रविकांत खोब्रागडे यांनी पत्रपरिषदेत दिली आहे.२५ मे रोजी प्रारंभ होणाऱ्या प्रचार यात्रेला वाकुडकर हे हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करतील. नांदेड येथे राज्यव्यापी शिबिरात बीआरएस नेते 'केसीआर' यांनी जाहीर केल्याप्रमाणे, २८८ मतदार संघात २८८ प्रचार गाड्या पत्रके वाटतील, जनतेशी संवाद साधतील.

# विद्युत प्रवाह उतरलेल्या खांबाला स्पर्श झाल्याने बालकाचा मृत्यू

## तालुक्यातील जांब तांडा येथील घटना : नातेवाईकांचा मृतदेह ताब्यात घेण्यास नकार

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** विजेच्या खांबाला विद्युत प्रवाह उतरल्याने खांबाला स्पर्श होऊन एका ३ वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याची घटना जिंतूर तालुक्यातील जांब तांडा येथे आज मंगळवारी सकाळी 8 च्या सुमारास घडली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की जिंतूर तालुक्यातील जांब तांडा येथे एका विद्युत खांबाला अचानक विद्युत प्रवाह उतरला.या विद्युत प्रवाह उतरलेल्या खांबाजवळ खेळत खेळत गेलेल्या ३ वर्षीय बालकाचा अचानक खांबाला स्पर्श झाल्याने त्याला विजेचा जोराचा धक्का बसला.यामध्ये तो गंभीर जखमी झाला.नातेवाईकांनी त्यास उपचारासाठी तात्काळ जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र त्याठिकाणी डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. अनिकेत अमोल राठोड असे मृत बालकाचे नाव आहे. दरम्यान महावितरणच्या गलथान कारभारामुळे सदर बालकाला आपला जीव गमवावा लागला. घटनेचा पंचनामा करून महावितरण अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच मृत बालकाच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्यात यावी. अशी मागणी करत जोपर्यंत महावितरण कडून लेखी आश्वासन देण्यात येत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पवित्रा मृत बालकाच्या नातेवाईकांनी घेतला. त्यानंतर महावितरणचे सहाय्यक अभियंता कामठी, आडबे यांनी ग्रामीण रुग्णालयात येऊन लेखी आश्वासन दिल्याने नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. याप्रकरणी चारठाणा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर